लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/



विशेष/६

मुंबई ■ अंक – ४१ ■ शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६ संपादिका : सौ. शांता वाणी ■ पाने ६ ■ किंमत २ रु. ■ PRGI REG NO.MHMAR/26/A7630 lokshahilive@gmail.com

सोने-चांदी

■ सोने (प्रति १० ग्रॅम) : १,४१,५४०
■ चांदी (प्रति १ किलो):१,८४,८६०

तापमान

■ कमाल : ३३ अंश सेल्सिअस
■ किमान : २३ अंश सेल्सिअस

महत्वाचे

महार वतन जमिनीचा भोगवटा बदल; उच्च न्यायालयात याचिका

मुंबई : पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात महार वतन जमिनीचा भोगवटा बदलताना तत्कालीन तहसीलदारांनी जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार अनधिकृतपणे वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी कारवाई होत नसल्याने ॲड. वसिम सामलेवाले यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका (क्र. ३११९४/२०२६) दाखल करण्यात आली आहे. महसूल सचिव, विभागीय आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी आणि खेड उपविभागीय अधिकारी यांना प्रतिवादी करण्यात आले आहे सुमारे सात वर्षांपूर्वी तत्कालीन तहसीलदारांनी एका महार वतन जमिनीचा नजराणा भरून घेत भोगवटा वर्ग दोनमधून वर्ग एकमध्ये बदल केल्याचा आरोप आहे. या नोंदीच्या आधारे अनेक नागरिकांनी भूखंड खरेदी केले. सामाजिक कार्यकर्ते अशोकराव टाव्हरे यांच्या तक्रारीनंतर महसूल विभागाने अहवाल मागविला होता. कुळकायदा शाखेने तत्कालीन तहसीलदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रशासकीय कारवाईची शिफारस केली आहे.

जागतिक लकवा दिनाच्या निमित्ताने जनजागृती

मुंबई : जागतिक स्ट्रोक दिनानिमित्त परेल येथील ग्लोनेगल्स हॉस्पिटलमध्ये स्ट्रोकबद्दल लकवा आणि उपचारांच्या कालावधीविषयी जनजागृती करण्यासाठी एका विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली स्ट्रोकचे वाढते प्रमाण, धोक्याची चिन्हे आणि वेळेवर वैद्यकीय मदत घेण्याचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. नितीन डांगे, डॉ. शिरीष हस्तक, डॉ. पंकज अग्रवाल, डॉ संगीता रावत, डॉ मयुर घरत, डॉ कुशल भाटिया, डॉ हुसेन नलवाला उपस्थित होते. सध्या २० ते ३० वयोगटातील तरुणांमध्ये स्ट्रोकची प्रकरणे वेगाने वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आणि जीवन शैलीतील बदलांवर प्रकाश टाकण्यात आला. भारतात ५ टक्क्यांहून कमी रुग्ण वेळेवर (उपचाराच्या सुवर्णकाळात) रुग्णालयात पोहोचतात, तर इतर देशांमध्ये हे प्रमाण सुमारे १५ ते २० टक्के आहे.

पूर्णेकर हत्या प्रकरणाचे राजकारण नको : एकनाथ शिंदे

दोषींवर कठोर कारवाई व्हावी; निष्पक्ष तपासासाठी पोलीस आयुक्तांना निर्देश : शिवसेना युतीधर्म पाळण्यावर ठाम

लोकशाही न्यूज नेटवर्क
ठाणे ✍ प्रतिनिधी

प्रदीप पूर्णेकर यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी घटना असून, या प्रकरणाचे राजकीय भांडवल करणे त्याहूनही दुर्दैवी आहे. या हत्येचा तपास कोणत्याही दबावाशिवाय निष्पक्षपणे करण्याचे निर्देश ठाणे पोलीस आयुक्तांना दिले आहेत. दोषी कोणताही असला तरी त्याला पाठीशी घातले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना मांडली. यावेळी त्यांनी ठाण्यातील कायदा-सुव्यवस्था आणि शिवसेना-भाजप युतीबाबतही भाष्य केले. पूर्णेकर हत्या प्रकरणामुळे निर्माण झालेल्या



राजकीय वादाच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. घटना घडल्यानंतर पहिल्याच दिवशी आपण स्वतः ठाणे पोलीस आयुक्तांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून निष्पक्ष चौकशी करण्याच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली असून गुन्ह्यात वापरलेले शस्त्रही जप्त केले आहे. पुढील तपास सुरू असल्याने पोलिसांना त्यांचे काम करू द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. पूर्णेकर कुटुंबीयांच्या दुःखात शिवसेना सहभागी असून त्यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या प्रत्येक दोषीवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. मात्र दुर्दैवी घटनेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न योग्य नसल्याचे शिंदे यांनी नमूद केले. दरम्यान, मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा पाठविल्याची माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली. पूर्णेकर हत्या प्रकरणाशी आपले नाव सातत्याने जोडले जात असल्याने पक्षाची अडचण होत असल्याची भावना त्यांनी राजीनामापत्रात व्यक्त केली आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. ठाण्यातील कायदा-सुव्यवस्थेबाबत बोलताना शिंदे यांनी काही घटनांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरात बाहेरून येणाऱ्या काही व्यक्तींकडून जाळपोळ, महामार्ग रोखणे तसेच पोलिसांवर दगडफेक करण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला. नौपाडा परिसरात झालेल्या दगडफेकीत पोलीस जखमी झाल्याचा उल्लेख करत अशा घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे ते म्हणाले. ठाणेकरांच्या शांततेला बाधा पोहोचू दिली जाणार नाही. शहरातील कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले.

युतीधर्म पाळणे हीच शिवसेनेची भूमिका

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना-भाजप युतीतील राजकीय समीकरणांवरही शिंदे यांनी भाष्य केले. शिवसेनेने नेहमीच युतीधर्माचे पालन केले असून यापुढेही ही भूमिका कायम राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही ठिकाणी मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढती झाल्या असल्या तरी विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेने युतीधर्म पाळला आहे. युतीतील सर्व घटक पक्षांनीही परस्पर सहकार्याची भूमिका ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

एमपीएससीच्या नऊ परीक्षांची चौकशी होणार!

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध स्पर्धा परीक्षांमधील प्रश्नपत्रिका आणि उत्तरतालिका फुटल्याच्या कथित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी आयोग स्थापन करण्यात आला आहे. या प्रकरणांबाबत माहिती किंवा तक्रारी असलेल्या विद्यार्थी, परीक्षार्थी, व्यक्ती आणि संबंधित संस्थांनी १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्रासह आपली निवेदने सादर करावीत, असे आवाहन चौकशी आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली हा चौकशी आयोग गठित करण्यात आला आहे. आयोगामार्फत एम पीएससीच्या एकूण नऊ परीक्षांशी संबंधित कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यात येणार आहे. यामध्ये औषध निरीक्षक गट-ब परीक्षा २०२५, महाराष्ट्र गट-ब संयुक्त पूर्व व मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र गट-क संयुक्त पूर्व व मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२४, अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा २०२३, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५ आणि विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५ यांचा समावेश आहे. या परीक्षांसंदर्भात तक्रारी किंवा माहिती असलेल्या व्यक्तींनी मराठी अथवा इंग्रजी भाषेत निवेदन सादर करावे. त्यासोबत वैध ओळखपत्राची प्रत आणि संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे. निवेदने अन्न व औषध प्रशासन भवन, दालन क्रमांक २०१, दुसरा मजला, बीकेसी, वांद्रे पूर्व, मुंबई येथे सादर करता येतील. तसेच निवेदनाची एक प्रत complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या ई-मेलवर पाठविता येणार आहे.

टोरंट प्रकल्प बचाव समितीचा कर्जत बंदला विरोध

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मांडली भूमिका


लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील टोरंट पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पावरून कर्जत परिसरातील राजकीय वातावरण तापले आहे. प्रकल्पाच्या विरोधात २ नोव्हेंबर रोजी 'कर्जत बंद'ची हाक देण्यात आली असताना, टोरंट प्रकल्प बचाव समितीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या बंदला समितीचा विरोध असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष अजय सिंह सेंगर यांनी दिली. या प्रकल्पासाठी सुमारे ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, टप्प्याटप्प्याने एकूण १२ हजार मेगावॉट क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी



आवश्यक असलेल्या २३३ हेक्टर वनजमिनीच्या बदल्यात २५३ हेक्टर खासगी जमीन वन विभागाला हस्तांतरित केल्याचा दावा समितीने केला आहे. तसेच एकूण ९० हजार वृक्षलागवडीचे नियोजन असल्याचेही समितीने म्हटले आहे. प्रकल्पाच्या विरोधात २ नोव्हेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या 'कर्जत बंद'ला समितीने विरोध दर्शविला आहे. विकास आणि रोजगाराच्या संधी रोखण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी भूमिका समितीने मांडली आहे. दरम्यान, प्रकल्पाच्या समर्थनार्थ आणि विरोधात वेगवेगळ्या भूमिका मांडल्या जात असताना पर्यावरणीय मंजुरी, स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि पुनर्वसनाच्या प्रश्नांवर पारदर्शक माहिती उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे प्रस्तावित बंदच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची भूमिका आणि स्थानिकांशी होणाऱ्या चर्चेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गणेशोत्सवाला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा मिळवून देणार!



लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेल्या गणेशोत्सवाला युनेस्कोच्या जागतिक अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या यादीत स्थान मिळवून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून जपल्या जाणाऱ्या परंपरा, संस्कार, कला आणि सामाजिक एकोप्याचा वारसा जागतिक पातळीवर पोहोचविण्यासाठी 'बाप्पा डॉट ओआरजी' हे डिजिटल व्यासपीठ महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.मुंबईतील बँडस्टँड येथे 'बाप्पा डॉट ओआरजी' आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आयोजित 'बाप्पाचा कट्टा' या ९० दिवसांच्या सांस्कृतिक उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अभिनेते अमेय वाघ, अभिनेता व दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी, 'बाप्पा डॉट ओआरजी'चे संस्थापक श्रीपाद अष्टेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षापासून गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. यंदा महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांसह देशभरात आणि दुबईसारख्या परदेशातील ठिकाणीही गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून कला, संस्कृती, सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. त्यामुळे या उत्सवाला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे शेलार यांनी स्पष्ट केले.या उपक्रमांतर्गत नागरिकांनी गणेशोत्सवाशी संबंधित आपल्या आठवणी, कथा, जुनी छायाचित्रे आणि पारंपरिक प्रथांची माहिती 'बाप्पा डॉट ओआरजी' या डिजिटल व्यासपीठावर नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून गणेशोत्सवाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे डिजिटल 'कल्चरल प्रिझर्व्हर सर्टिफिकेट' देण्यात येणार आहे.'बाप्पाचा कट्टा' या ९० दिवसांच्या उपक्रमात उखाणे, म्हणी, ओव्या, पारंपरिक खेळ आणि विविध लोककलांच्या स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. ऑनलाइन निवडीनंतर कलाकारांना प्रत्यक्ष सादरीकरणाची संधी मिळणार असून विजेत्यांना पारितोषिके देण्यात येतील.यावेळी निपुण धर्माधिकारी यांनी संस्कृती आणि तंत्रज्ञानाचा संगम साधणारा हा उपक्रम नव्या पिढीसाठी उपयुक्त ठरेल, असे सांगितले. तर अमेय वाघ यांनी लोकमान्य टिळकांनी रुजविलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या एकात्मतेच्या भावनेचे जतन करण्याची गरज व्यक्त केली.

बाहेरच्या उमेदवाराला भाजपच्याच कार्यकर्त्यांनी नाकारले!

महायुतीतील मित्रपक्षांना भाजपने योग्य सन्मान द्यावा; शिवसेना प्रवक्ते आनंद परांजपे यांचा घणाघात

लोकशाही न्यूज नेटवर्क
ठाणे ✍ प्रतिनिधी

विधान परिषद निवडणुकीतील पराभवाचे खापर शिवसेनेवर फोडणे चुकीचे असून, भाजपने स्वतःच्या कार्यकर्त्यांमधील नाराजी आणि उमेदवार निवडीतील चुकांचे आत्मपरीक्षण करावे, असा सल्ला शिवसेनेचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी दिला. पुणे पदवीधर मतदारसंघात बाहेरचा उमेदवार दिल्यामुळे भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. या उमेदवाराला शिवसेनेने नव्हे, तर भाजपच्याच कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी नाकारल्याचा दावा त्यांनी ठाण्यातील पत्रकार परिषदेत केला. पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांपैकी एक जागा शिवसेनेला मिळावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी होती. मात्र, भाजपने दोन्ही जागांवर दावा केला. महायुतीचा धर्म पाळत शिवसेनेने पुणे शिक्षक मतदारसंघातील उमेदवार मंगेश चिवटे यांचा अर्ज मागे घेतला. तरीही पराभवासाठी शिवसेनेला जबाबदार धरणे योग्य नसल्याचे परांजपे म्हणाले. अमरावती शिक्षक मतदारसंघात भाजपशी संबंधित बंडखोर उमेदवार सक्रिय असतानाही शिवसेनेचे किरण सरनाईक विजयी झाले. मराठवाड्यात भाजपचे प्रशांत बंब यांनी नेमका कोणाचा प्रचार केला, याची चौकशी भाजपने करावी. नागपूरमध्येही भाजपचे माजी आमदार अनिल सोले यांच्या बंडखोरीचा निवडणुकीवर परिणाम झाल्याचा आरोप त्यांनी केला. महायुतीला पाचही जागांवर विजय अपेक्षित असताना केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे मित्रपक्षांवर आरोप करण्याऐवजी भाजपने निवडणूक रणनीतीतील त्रुटी शोधाव्यात. 'सर्व जागा आम्हीच लढवायच्या आणि जिंकायच्या' ही भूमिका महायुतीच्या हिताची नाही. आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने परस्पर विश्वास, सन्मान आणि समन्वय राखून काम करावे, असे आवाहन परांजपे यांनी केले.

महापालिका मुख्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा



लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

मतदार यादीतील कथित घोटाळ्याविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज बुधवारी मुंबई महानगर पालिका मुख्यालय समोर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. 'ज्ञानेश कुमार हटाव मार्च' या नावाने राणीबाग, भायखळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच मुंबई महानगरपालिका मुख्यालयादरम्यान हा जोरदार मोर्चा पार पडला. आंदोलनादरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात व मतदार यादीतील घोळ संपवण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या प्रसंगी माजी आमदार कपिल पाटील यांच्यासह पक्षाचे विविध प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाही व मताधिकार वाचवण्यासाठी हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा या वेळी नेत्यांनी दिला.

राज्यातील 10 हजार 312 ग्रंथालयांना 79 कोटींचे अनुदान!

पहिला हप्ता थेट बँक खात्यात जमा; उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील सहाय्यक परिरक्षण अनुदानाचा पहिला हप्ता थेट त्यांच्या बँक खात्यांत ऑनलाइन जमा करण्यात आला आहे. यासाठी तब्बल ७९ कोटी २१ लाख ९४ हजार रुपयांची देयके पारित करण्यात आली असून, राज्यातील १० हजार ३१२ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना या निधीचा लाभ मिळणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. या निर्णयामुळे ग्रंथालयांच्या दैनंदिन कामकाजाला गती मिळण्यासह वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना आर्थिक बळ मिळणार आहे. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या देखभाल, व्यवस्थापन आणि विकासासाठी शासनाकडून दरवर्षी दोन समान हप्त्यांत सहाय्यक परिरक्षण अनुदान दिले जाते. यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत पारंपरिक पद्धतीने अनुदानाचे वितरण केले जात होते. या प्रक्रियेमुळे सर्व ग्रंथालयांना एकाच वेळी निधी उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होत होत्या. अनेकदा प्रशासकीय प्रक्रियेमुळे



अनुदान मिळण्यास विलंब होत असल्याने ग्रंथालयांच्या नियमित खर्चाचे नियोजन करणे कठीण जात होते. या अडचणी दूर करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि ग्रंथालय संचालनालयाच्या माध्यमातून सन २०२२-२३ पासून संगणकाधारित 'ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली' विकसित करण्यात आली.

या प्रणालीद्वारे ग्रंथालयांचे वार्षिक अहवाल ऑनलाइन स्वीकारणे, अनुदानाची देयके तयार करणे आणि निधी वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. त्यामुळे अनुदान वितरणातील पारदर्शकता वाढण्याबरोबरच प्रशासकीय काम काजालाही गती मिळाली आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पहिल्या हप्त्यासाठी १३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन ज्ञापनानुसार निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर ऑनलाइन वार्षिक अहवाल प्राप्त झालेल्या राज्यातील १० हजार ३१२ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची अनुदान देयके संगणकीय प्रणालीद्वारे पारित करण्यात आली. शासनाच्या धोरणानुसार २९ ऑक्टोबर रोजी व्हीपीडीए प्रणालीच्या माध्यमातून संबंधित ग्रंथालयांच्या बँक खात्यांत थेट निधी जमा करण्यात आला. सार्वजनिक ग्रंथालये ही ग्रामीण आणि शहरी भागातील वाचनसंस्कृती टिकविणारी महत्त्वाची केंद्रे आहेत. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य वाचकांसाठी ही ग्रंथालये ज्ञानाची दालने ठरत आहेत. मात्र, अनेक ग्रंथालयांना नियमित खर्च भागविण्यासाठी शासकीय अनुदानावर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत अनुदानाचा पहिला हप्ता उपलब्ध झाल्याने ग्रंथालयांच्या व्यवस्थापनाला दिलासा मिळणार आहे. ऑनलाइन प्रणालीमुळे अनुदान वितरणातील विलंब कमी होऊन निधी थेट संबंधित ग्रंथालयांपर्यंत पोहोचत आहे. यामुळे ग्रंथालयांची देखभाल, आवश्यक साहित्याची उपलब्धता, वाचन सुविधा आणि विविध उपक्रमांचे नियोजन करणे अधिक सुलभ होणार.

चायनीज व निकृष्ट फटाक्यांच्या विक्रीवर जिल्हा प्रशासनाचा कडक वॉच!

ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनच्या तक्रारीनंतर विशेष तपासणी मोहीम; अवैध साठा आढळल्यास जप्तीसह फौजदारी कारवाई

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात चायनीज, निकृष्ट दर्जाचे आणि प्रतिबंधित फटाक्यांची अवैध साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदारांना विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ग्राहकांची होणारी फसवणूक आणि सार्वजनिक सुरक्षिततेला निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन, जळगाव यांनी २५ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रशासनाने तपासणीचे आदेश जारी केले आहेत. चायनीज व प्रतिबंधित फटाक्यांमुळे नागरिकांच्या जीविताला, सार्वजनिक सुरक्षिततेला तसेच पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारांना आळा घालण्यावर



भर देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार फटाके विक्रीची दुकाने, गोदामे, साठवणूक केंद्रे आणि तात्पुरत्या स्टॉल्सची संयुक्त विशेष तपासणी केली जाणार आहे. या मोहिमेत पोलीस, अग्निशमन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि 'पेसो' यांच्या समन्वयाने कारवाई करण्यात येईल. विस्फोटक नियम, २००८ नुसार परवान्यात नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक फटाक्यांचा साठा ठेवणे, तात्पुरत्या दुकानांसाठी निर्धारित नियम आणि अंतराचे निकष न पाळणे, अशा प्रकारांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. विनापरवाना, चायनीज किंवा प्रतिबंधित फटाक्यांचा साठा आढळल्यास तो तातडीने जप्त करण्यात येईल. संबंधित आस्थापना बंद करण्यासह दोषींविरुद्ध पोलिसांत फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. याशिवाय दुकानांमध्ये आणि गोदामांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन मार्ग तसेच सुरक्षित विद्युत जोडण्यांचीही तपासणी केली जाणार आहे. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने हे प्रकरण संवेदनशील असल्याने सर्व निर्देशांची तातडीने आणि कोणतीही हयगय न करता अंमलबजावणी करावी, असे आदेश अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी दिले आहेत.

पेसो' मान्यताप्राप्त फटाकेच खरेदी करा : नितीन सोळंके

या संदर्भात ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके म्हणाले की, ग्राहक आपल्या कष्टाच्या कमाईतून सणासाठी फटाके खरेदी करतात. मात्र, बाजारात मोठ्या प्रमाणावर चायनीज आणि निकृष्ट दर्जाचे फटाके दाखल होत आहेत. अनेकदा हे फटाके फोडण्याचा प्रयत्न केला असता फुटत नाहीत आणि फुसके निघतात. त्यामुळे ग्राहकांची आर्थिक फसवणूक होण्याबरोबरच सणाचा आनंदही हिरावला जातो. अशा निकृष्ट आणि बनावट फटाक्यांचा साठा प्रशासनाने जप्त करून बाजारातून पूर्णपणे हटवावा. ग्राहकांनीही फटाके खरेदी करताना विशेष काळजी घेऊन केवळ पेट्रोलियम आणि विस्फोटक सुरक्षा संघटना अर्थात 'पेसो' मान्यताप्राप्त फटाकेच खरेदी करावेत. तसेच फटाके विक्रेते आणि दुकानदारांनी 'पेसो'ने मंजूर केलेल्या वैध फटाक्यांची व उत्पादनांची यादी दुकानात स्पष्टपणे लावावी, जेणेकरून ग्राहकांची फसवणूक टाळता येईल, असे आवाहन नितीन सोळंके यांनी केले.

अवजड कंटेनर गटारात मोठी दुर्घटना टळली

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुक्ताईनगर ✍ प्रतिनिधी

शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महालक्ष्मी गॅस एजन्सीसमोरील बोदवड रोडवर एक भलामोठा कंटेनर थेट गटारात जाऊन अडकल्याची घटना घडली. रस्त्यावरून जाणाऱ्या पादचारी महिलांना वाचवण्याच्या प्रयत्नात कंटेनर गटारात अडकल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. मात्र, या घटनेमुळे पादचारी नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मुक्ताईनगर शहरातून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवर उडणारी धूळ, मोठ्या वाहनांची वर्दळ आणि अरुंद रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण यामुळे पादचाऱ्यांसाठी रस्त्यावरून चालणेही धोकादायक ठरत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना अवजड वाहनांच्या वाहतुकीचा मोठा धोका निर्माण झाला आहे. महालक्ष्मी गॅस एजन्सीसमोरील घटनेत कंटेनर गटारात अडकल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, अशा प्रकारची घटना पुन्हा घडल्यास त्याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज कंटेनर गटारात अडकला म्हणून संभाव्य दुर्घटना टळली; परंतु उद्या याच ठिकाणी एखाद्या पादचारी महिलेचा, ज्येष्ठ नागरिकाचा किंवा अन्य नागरिकाचा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? नागरिकांना सुरक्षितपणे रस्त्यावरून चालण्याचा अधिकार नाही का? अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे पादचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होत असेल.

एसआरपीएफमध्ये महिलांची स्वतंत्र बटालियन होणार!

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

राज्य राखीव पोलीस दलात (एसआरपीएफ) महिलांची स्वतंत्र बटालियन स्थापन करण्याच्या मागणीला लवकरच यश मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलीस बॉईज असोसिएशनने २०२२ पासून यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

यासंदर्भात गृहराज्यमंत्री योगेश रामदास कदम यांनी मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन सकारात्मक चर्चा केली.



या बैठकीला पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक निखिल गुप्ता, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश आणि विशेष पोलीस महानिरीक्षक निधीश मिश्रा उपस्थित होते. केंद्राच्या सीआरपीएफ, सीआयएसएफ, बीएसएफ आणि आयटीबीपी या दलांमध्ये महिलांची भरती तसेच स्वतंत्र महिला बटालियन कार्यरत आहेत. मात्र, महाराष्ट्रातील एसआरपीएफमध्ये महिलांना भरतीची संधी उपलब्ध नसल्याने स्वतंत्र बटालियन स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती. या निर्णयामुळे राज्यातील महिलांना आणि तरुणींना एसआरपीएफमध्ये नोकरीची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. विशेषतः एसआरपीएफमधील अनुकंपाधारक महिला व मुलींना सफाई कामगार किंवा मदतनीस म्हणून काम करण्याऐवजी जवान म्हणून सेवेत काम करण्याची संधी मिळू शकते. या मागणीसाठी पोलीस बॉईज असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद वाघमारे, जळगाव जिल्हाध्यक्ष भूषण नागरे, उपाध्यक्ष हेमंत तावडे आणि जिल्हा कार्यकारिणीने पाठपुरावा केला. या प्रयत्नांबद्दल एसआरपीएफ जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

पाच वेळा आमदारकी, प्रदीर्घ मंत्रिपदाचा अनुभव आणि जिल्ह्याच्या राजकारणात अनेक वर्षांपासून सक्रिय असलेले राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते ना. गुलाबराव पाटील यांनी आता सहकार क्षेत्रातील महत्त्वाच्या जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतही पाऊल टाकले आहे. आज (दि. ३०) त्यांनी जळगाव तालुका विकास सोसायटी मतदारसंघातून आपला



उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीनंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत त्यांचा थेट सहभाग ही यंदाच्या निवडणुकीतील लक्षवेधी घडामोड ठरली आहे. यावेळी आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्यासह जळगाव तालुका व जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ पदाधिकारी, विविध विकास सोसायट्यांचे ठरावधारक प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ.विनोद कोतकर यांना राज्यस्तरीय वैद्यकीय परिषद मार्गदर्शनाचे निमंत्रण

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव ✍ प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ तथा चाळीसगाव स्त्रीरोगतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. विनोद मुरलीधर कोतकर यांना पुणे प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ संघटनेतर्फे आयोजित 'ओजस २०२६' या अमोग्स विभागीय वैद्यकीय परिषदेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.



ही परिषद ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर २०२६ रोजी पुण्यातील शेरेटन ग्रँड हॉटेलमध्ये होणार आहे. या परिषदेत १ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० ते ११ या वेळेत होणाऱ्या 'समस्या आणि निर्णय' या वैज्ञानिक सत्रात डॉ. कोतकर गर्भातील बाळाच्या हालचाली कमी जाणवणे या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. बाळाच्या सुरक्षिततेसाठी योग्य निदान आणि उपचारांबाबत ते उपस्थित स्त्रीरोगतज्ज्ञांना माहिती देतील. त्यांच्या निवडीमुळे चाळीसगावच्या वैद्यकीय क्षेत्राचा गौरव झाला असून, त्यांचे अभिनंदन होत आहे.

पशुवैद्यकीय शिबीर, कडबा-कुट्टीवर युरिया प्रक्रिया प्रात्यक्षिक

लोकशाही न्यूज नेटवर्क
चोपडा ✍ प्रतिनिधी

पशुवैद्यकीय चिकित्सालय हातेड चोपडा अंतर्गत बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी काझीपुरा गावात पशुरोग निदान, उपचार व वंध्यत्व निवारण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील अनेक पशुपालकांनी आपल्या जनावरांच्या आरोग्याविषयी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. या कार्यक्रम दरम्यान चारा साक्षरता आणि



संवर्धन अभियानांतर्गत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. वैजयंता टेकाडे (पशुवैद्यकीय अधिकारी, श्रेणी-१ पशुवैद्यकीय दवाखाना, हातेड, ता. चोपडा) यांनी निकृष्ट दर्जाचा चारा सकस बनवण्यासाठी कडबा-कुट्टीवर युरिया प्रक्रिया कशी करावी, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच अझोला ही पाण्यात उगवणारी पौष्टिक व स्वस्त जलवनस्पती पशुखाद्य म्हणून कशी वापरावी आणि हायड्रोपोनिक्स चारा उत्पादनाची माहिती देऊन पशुपालकांना दुग्धव्यवसायात खर्चात बचत करण्याचे महत्त्व पटवून दिले. या शिबिरात शेतकऱ्यांकडून चारा बियाण्याची मागणी ही नोंदविण्यात आली. कार्यक्रमाला काझीपुरा परिसरातील प्रगतीशील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग जळगावचे जिल्हा उपायुक्त डॉ. प्रदीप झोड यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच स्थानिक सहकारी व कर्मचारी राहुल बाविस्कर, मनोज महाजन, प्रवीण साळवे, सागर चौधरी व तुषार सोनवणे यांचे विशेष सहकार्य केले.

सख्खा पुतण्यानेच काकूच्या घरातील दागिने लुटले

लोकशाही न्यूज नेटवर्क
अंबरनाथ ✍ प्रतिनिधी

तालुक्यातील वांगणी परिसरात एका ८० वर्षीय वृद्ध महिलेच्या घरात घुसून तिचे दागिने लुटणाऱ्या टोळीचा कुळगांव ग्रामीण पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला आहे. पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात घुसून सोन्याचे दागिने लुटणारा मुख्य आरोपी दुसरा कोणी नसून पीडित वृद्धेचा सख्खा पुतण्याच निघाला आहे. पोलिसांनी पुतण्यासह तिघा जणांना बेड्या ठोकल्या आहेत. २४ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन अनोळखी इसमांनी भाड्याने खोली हवी असल्याचे सांगून वयोवृद्ध महिलेकडे पाणी मागितले. महिलेने पाणी दिल्यानंतर आरोपींनी घरात बळकावणी करत प्रवेश केला. त्यानंतर गळ्यातील सोन्याची माळ आणि हातातील बांगड्या बळजबरीने काढून घेत, जीवे मारण्याची धमकी देऊन ते पसार झाले होते. याप्रकरणी कुळगांव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली.

जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनत हाच यशाचा मंत्र!

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन : पाळधीत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिर : सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण

लोकशाही न्यूज नेटवर्क
पाळधी ✍ प्रतिनिधी

ग्रामीण भागातील युवक - युवतींमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि कर्तृत्वाची कमतरता नाही. गरज आहे ती योग्य मार्गदर्शन, संधी आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची. युवकांनो, आयुष्यात मोठी स्वप्ने पहा मात्र ती सत्यात उतरवण्यासाठी कठोर परिश्रम, शिस्त, चिकाटी आणि आत्मविश्वासाची जोड द्यावी लागते. सातत्यपूर्ण मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या युवक-युवतींनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून जिद्दीने तयारी करावी, असे प्रेरणादायी आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले. जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे पाळधी येथे आयोजित पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण



शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते झाले. या शिबिराला धरणगाव तालुक्यासह परिसरातील ४०० हून अधिक युवक-युवतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तत्पूर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते पाळधी पोलीस दूरक्षेत्रात बसविण्यात आलेल्या ११ सौरऊर्जेवर चालणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करण्यात आले. या यंत्रणेमुळे परिसरातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, पोलीस भरतीसाठी दररोजच्या मैदानी सरावाला लेखी परीक्षेच्या अभ्यासाची जोड द्या. मोबाईल आणि सोशल मीडियावर अनावश्यक वेळ घालवण्यापेक्षा तो वेळ स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी वापरा. स्पर्धा मोठी असली तरी मेहनत आणि सातत्याच्या बळावर यश मिळवता येते. ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना योग्य दिशा देण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, युवकांनी या संधीचे यशात रूपांतर करावे, असेही त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी प्रास्ताविकातून पोलीस भरती प्रक्रिया, मैदानी व लेखी परीक्षा, आवश्यक तयारी आणि प्रशिक्षण शिबिराच्या उद्देशाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिरात तज्ज्ञांनी उमेदवारांना शारीरिक तंदुरुस्ती, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, अमळनेर विभागाचे पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, राखीव पोलीस निरीक्षक प्रशांत शुगरवाल, धरणगावचे पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड, पाळधी दूरक्षेत्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भूषण कोते यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित माळी यांनी केले. आभार अमळनेर विभागाचे पोलीस उपअधीक्षक विनायक कोते यांनी मानले.

स्व.आर.आर.आबांच्या आठवणींना उजाळा

यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वर्गीय आर. आर. आबा पाटील यांच्या आठवणींना भावनिक उजाळा दिला. आज गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांतील मुले-मुली पोलीस दलात भरती होऊन आपल्या आई-वडिलांची स्वप्ने साकार करीत आहेत. याचे सर्व श्रेय स्वर्गीय आर. आर. आबांना जाते. कष्टकऱ्याचे मूल जेव्हा पोलीस गणवेश परिधान करते, तेव्हा तो केवळ त्याचा विजय नसतो, तर आई-वडिलांच्या घामाचा आणि त्यागाचा सन्मान असतो. प्रामाणिक कष्ट कधीच वाया जात नाहीत; एक दिवस त्या कष्टांचे चीज निश्चितच होते, अशा भावनिक शब्दांत त्यांनी युवक-युवतींना प्रेरणा दिली.

लोकशाही

संपादकीय

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत जोरदार चुरस आणि रंगत!

जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत चांगलीच चुरस आणि रंगत आली आहे. आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. आतापर्यंत एकूण ८६४ उमदवारी अर्जांची विक्री झाली असून, आज शेवटच्या दिवशी एकूण ४०२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. या एकूण ४०२ उमेदवारी अर्जांची २ नोव्हेंबर रोजी छाननी होणार आहे. त्यानंतर किती उमेदवारी अर्ज वैध ठरतील, हे स्पष्ट होईल. उमदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांचा समावेश आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज प्रत्यक्ष भरला असून, गिरीश महाजन व रक्षा खडसे यांचे उमेदवारी अर्ज सूचकांमार्फत भरण्यात आले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये ज्या संचालकांना सलग दहा वर्षे झाली आहेत, त्यांनी अर्ज भरलेला नाही. मात्र, पाचोऱ्याचे आमदार किशोर पाटील यांचे पुत्र विशाल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्याचप्रमाणे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वतः अर्ज भरला असला, तरी त्यांचे पुत्र प्रताप पाटील यांनी धरणगाव सोसायटी मतदारसंघातून अर्ज दाखल केला आहे. जामनेरमध्ये नगराध्यक्ष साधना महाजन यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. चोपडा येथून आमदार चंद्रकांत पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. चाळीसगावमधून आमदार मंगेश चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मुक्ताईनगर व बोदवड येथूनही आमदार चंद्रकांत पाटील यांनी उमदवारी अर्ज दाखल केला आहे. २ नोव्हेंबर रोजी छाननी झाल्यानंतर वैध उमेदवारी अर्जांची अधिकृत घोषणा होईल. त्यानंतर १७ दिवसांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी प्रत्यक्ष किती उमेदवार रिंगणात राहतील, हे दिसून येईल. आता भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल केले आहेत. मात्र, अद्याप महायुतीचा निर्णय झालेला नाही. महायुतीची एक बैठक प्रथम दर्शनी पार पडली. त्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात काही अडचण नसल्याचे दिसून आले; परंतु शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जास्त जागांची मागणी करण्यात आल्यामुळे महायुतीचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी अजून वेळ असल्यामुळे वरिष्ठ स्तरावर गिरीश महाजन आणि गुलाबराव पाटील एकत्र बसून याबाबत निर्णय घेतील, असे आमदार मंगेश चव्हाण यांनी पत्रकारांना सांगितले. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. त्यातील एक वैशिष्ट्य म्हणजे पारोळा येथील आमदार अमोल पाटील यांच्या पत्नी व आईचा उमेदवारी अर्ज जवळजवळ बिनविरोध झाल्यात जमा आहे. पारोळा तालुक्यात सर्वांत कमी उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत, हे विशेष होय. माजी महापौर जयश्री महाजन यांनीही महायुतीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्या विद्यमान संचालक आहेत. माजी चेअरमन संजय पवार यांच्या पत्नीचाही उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. माजी मंत्री गुलाबराव देवकर यांचे पुत्र विशाल देवकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गुलाबराव देवकर यांना संचालक म्हणून सलग दहा वर्षे झाल्याने त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेला नाही.

एकंदरीत, जळगाव जिल्हा बँकेच्या निवडणुकीत साधारणतः दोन पॅनल होण्याची शक्यता आहे. त्यात एक महायुतीचा, तर दुसरा महाविकास आघाडीचा किंवा सर्वपक्षीय पॅनल असू शकतो. महायुतीच्या पॅनलचा जोर राहील, असे चित्र आहे; परंतु उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतरच खरे चित्र स्पष्ट होईल. महाविकास आघाडीची बैठक पार पडली. त्यात उमेदवारांसाठी 'इलेक्टिव्ह मेरिट'ची कसोटी लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या पॅनलमध्ये शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना स्थान देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बहुतेक जागांबाबत प्रतिष्ठेची लढाई न करता, जे उमेदवार निवडून येऊ शकतात, त्यांनाच शक्यतो उमेदवारी देण्यात येणार असल्याचे कळते. त्याव्यतिरिक्त अपक्ष उमेदवारांचा भरणा जास्त राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या तरुण मुलांना बँकेचे संचालक म्हणून प्रवेश मिळाला पाहिजे, अशी या अपक्षांची इच्छा आहे. कोरी पाटी असलेले उमेदवार देण्यावर त्यांचा भर राहील, असे चित्र दिसते. त्यामुळे कदाचित अपक्षांचे मिळून तिसऱ्या पॅनलची शक्यता आहे; मात्र ते पॅनल कमकुवत राहील, असे म्हणावे लागेल. एकूण ३१ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत निकाल लागण्याआधीच महायुतीच्या तीन जागा बिनविरोध होण्याची शक्यता आहे. त्यात शिवसेना शिंदे गटाच्या दोन जागांचा समावेश आहे. निवडणुकीआधीच त्यांना गुलाल उधळण्याची संधी मिळाली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मात्र, असे झाल्यास खरा सामना भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीविरुद्ध काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांच्या महाविकास आघाडीच्या पॅनलमध्ये होणार आहे.





मानवी अस्तित्वासाठी पर्यावरण वाचवायलाच हवे!

सध्या महाराष्ट्रातील कर्जत जिल्ह्यात येऊ घातलेल्या संभाव्य टोरांटो या औद्योगिक प्रकल्पाच्या निमित्ताने होत असलेल्या लाखो वृक्षांच्या कत्तलीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. अगोदरच स्थापित झालेले अनेक औद्योगिक प्रकल्प, प्रचंड होत आलेली वृक्षतोड, वायू आणि जलप्रदूषणाचा वाढता अतिरेक कार्बन चे धोक्याची. पातळी ओलांडलेले उत्सर्जन यामुळे हवा अधिकाधिक गरम होतेय आणि तापमान उष्ण होतेय. याच प्रदूषणाचा आणि वाढत्या तापमानाचा दुष्परिणाम हा शेतीसह अन्य क्षेत्रावर होतोय. अगदी पर्यावरण इतके धोक्यात आले आहे की पृथ्वी वरील मानवी अस्तित्वच मुळात अवघ्या काही वर्षावर येऊन ठेपले आहे. याच गंभीर प्रश्नाच्या अनुषंगाने पर्यावरण अभ्यासक ॲड. गिरीश राऊत यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१) यंदा महाराष्ट्रात भीषण दुष्काळाचे चित्र आहे याचे कारण काय?

स्वातंत्र्यानंतर देशात सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात झालीं मात्र याच महाराष्ट्रात पाण्याची सर्वात चिंताजनक स्थिती आहे. महाराष्ट्रात जो दुष्काळ पडला आहे तो भयंकर आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. जनावरांना अन्न पाणी नाही. हा दुष्काळ असाधारण आहे. जो जागतिक तापमान वाढ आणि त्यातून. झालेल्या हवामान बदलाचा परिणाम आहे. २०१३ मधे वातावरणातील ४०० पी पी एम ही धोकादायक पातळी कार्बन डाय ऑक्साईड या वायूने ओलांडली आहे. मागील काही वर्षात तापमान वाढ ही महा विस्फोटक स्थितीत आहे. पृथ्वीवर जीवनासाठी महत्वाचे पर्यावरणीय पट्टे आता दहा वर्षात ३५ मैल या वेगाने विषुववृत्ताकडून ध्रुवाकडे सरकू. लागले आहेत. या गतीने सजीव. प्रजाती स्वतःला अनुकूल करून घेऊ. शकत नाही. याचा अर्थ सजीवांचे उच्चाटन झपाट्याने होते आहे.

२) महाराष्ट्रातच सर्वात गंभीर स्थिती का आहे?

याचे कारण युरोप मध्ये घडणाऱ्या घटनांमधून स्पष्ट होते. लाखो वर्ष शून्याजवळ तापमान असणारा युरोप गेल्या २० वर्षात तापमान वाढीच्या झळा अनुभवत आहे. या वर्षी अनेक देशात तापमान ४० ते ५० से पर्यंत गेले. याचा शेती आणि. मानवी जीवनावर भयंकर परिणाम झाला. याचे कारण औद्योगीकरण आणि अर्थव्यवस्था आहे. युरोप ने औद्योगीकरण वाढवले जीवाश्म इंधनाचा वापर वाढवला प्रचंड वृक्षतोड केली ज्यामुळे जैवविविधता धोक्यात आली. महाराष्ट्र नेमका युरोपच्याच वाटेवर चालला आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि प्रदूषणामुळे तापमान वाढ इतकी. प्रचंड वाढतेय की पुढील २५ वर्षातच मानवी अस्तित्वच संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झालेला आहे.

३) वाढत्या उष्णतामानाचा हा धोका टाळण्यासाठी उपाय काय आहेत?

आपल्याला वातावरणातील. कार्बन चे उत्सर्जन वाढून वातावरण अधिकाधिक उष्ण होतेय याची धोक्याची सूचना मिळाली होती मात्र आपण सर्वांनीच अतिरेक केला. आता युद्ध पातळीवर पर्यावरण रक्षणासाठी झटणे हेच आपल्या हाती आहे. सर्वात प्रथम. म्हणजे उद्योगाच्या निमित्त होणारी वृक्षांची कत्तल रोखून जळी स्थळी काष्ठीं पाषणी दिसेल तिथे वृक्ष लावून ते वाढवायला जगवायला हवेत. यासोबत पेट्रोल डिझेल सारख्या जीवाश्म. इंधनाचा वापर थांबवून इथेनॉल, इलेक्ट्रिक आणि सौर ऊर्जे चा वापर वाढवायलाच हवा. वातानुकूलित यंत्रणा बंद करायला हव्यात. पाण्याचा काटकसरीने वापर पावसाच्या पाण्याचा संचय प्लास्टिक चा वापर बंद अशा उपाय योजना प्रत्येकाने योजिल्या तरच पृथ्वीचे तापमान किमान काही अंशांनी कमी होऊन मानवाचे जगणे सुसह्य होईल.

वसंतनगर तांडा येथे 'उमेद पशुधन आधार केंद्र' सुरू!



मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे पशुधनाच्या चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना, वसंतनगर तांडा येथे लोकसहभागातून 'उमेद पशुधन आधार केंद्रा'ची सुरुवात झाली आहे. वसंतनगर तांडा तसेच परिसरातील गरजू पशुपालकांच्या पशुधनाला दुष्काळाच्या काळात आधार मिळावा, या उद्देशाने ग्रामपंचायत व उमेद अभियानांतर्गत महिला ग्रामसंघ यांच्या पुढाकाराने आणि नभांगण फाउंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाला बीडचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांचेही मार्गदर्शन व पाठिंबा लाभत आहे; तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितिन रहमान यांनी हा लोकसहभागाधारित नमुना परिसरातील इतर गावांमध्ये प्रतिकृती करण्यायोग्य असल्याचे प्रतिपादन केले आहे.

वसंतनगर तांडा येथे पावसाची अनिश्चितता, पाण्याची मर्यादित उपलब्धता आणि चाऱ्याची टंचाई यामुळे पशुधनाचे संगोपन करणे पशुपालकांसाठी आव्हानात्मक बनले आहे. उपलब्ध माहितीनुसार, गावाची लोकसंख्या सुमारे १, ६८१ असून पशुधनाची संख्या सुमारे ४७३ आहे. यंदा सरासरी ५५७ मिमी पावसाच्या तुलनेत आतापर्यंत केवळ २०१ मिमी पाऊस झाल्याची नोंद आहे. त्यामुळे पशुधनासाठी पाणी, चारा आणि आरोग्यविषयक मदतीचे नियोजन करणे अत्यावश्यक झाले आहे. या परिस्थितीत पशुधनाला वाऱ्यावर न सोडता समाजाने एकत्र येऊन त्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, या भावनेतून पशुधन आधार केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रात गरजू पशुपालकांच्या पशुधनाला उपलब्ध क्षमतेनुसार प्रवेश देऊन चारा, पाणी, प्राथमिक देखभाल आणि आवश्यकतेनुसार पशुवैद्यकीय सेवांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे केंद्र पुढील सुमारे दहा महिने चालविण्यासाठी लोकसहभाग, आर्थिक मदत, चाऱ्याची उपलब्धता आणि व्यवस्थापन यांची सातत्याने उभारणी करावी लागणार आहे.


बिनागुंडा

संकलन -संयोजन



सुबोध रणशेवरे
संपर्क : ९८३३१४६३५६

बिनागुंडा हे भाम रागड तालुक्यात वसलेले आहे. बिनागुंडा-कुओकोडी ऐतिहासिक गावे आहेत. हा भाग अबुजमादमध्ये येतो, या भागामध्ये राहणा-या आदिवासींना बडा माडिया म्हणतात. हा ७-८ गावांचा समूह आहे ज्यामध्ये १४० कुटुंबे आहेत. बिनागुंडा गावात पोहोचण्यासाठी, आपल्याला अहेरी-आलपल्ली-भाम रागड-लाहेरी आणि त्यानंतर बिनागुंडा-कुओकोडीकडे जावे लागेल. अंतर गडचिरोली पासून आणि चंद्रपूर पासून २१० किमी दूर आहे. या क्लस्टरला जवळजवळ ८ महिने कापला जातो. बी. आय. टी. टी. बांबूच्या बाहेरील उतारा आणि वाहतुकीसाठी रस्ताचे वाहन बनविते. आदिम जनजाती बांबू कटिंग आणि तेंदू पट्टा संकलनद्वारे मिळिवलेल्या मजुरीवर गुजराण करतात. ते लागवडीची शेती करीत असे. त्यांचे अस्तित्व जंगलावर प्रामुख्याने आहे. सदर ठिकाण शहरापासून दूर आहे आणि साध्या पद्धतीचे येथील ग्रामीण लोकांचे जीवनमान आहे. विविध सोयी सुविधे चा अभाव आहे. हे ठिकाण धबधब्यांसाठी प्रसिद्ध आहे. बिनागुंडा हे तालुक्यापासून ४० कि. मी. अंतरावर पूर्वेस आहे. सदर



गाव हे महाराष्ट्र व छत्तीसगडच्या सीमेवर वसलेले आहे.

या डोंगरावर पश्चिमेकडील अबुझदचा पर्वत आहे. ४ कि. मी. अंतरावर कुव्वाकोडी हे गाव डोंगराच्या टोकावर स्थित आहे. भामरागड येथे विश्रामगृह उपलब्द असून ते गडचिरोली पासून १६० किमी अंतरावर आहे.

पारंपरिक चवीला आधुनिक साज देणाऱ्या हटके रेसिपीज

दिवाळी म्हटली की घराघरांतून दरवळणारा चकली, चिवडा, करंजी, शंकरपाळी आणि लाडवांचा सुगंध आठवतो. मात्र यंदाच्या दिवाळीत नेहमीच्या फराळाला थोडा आधुनिक साज दिला, तर फराळाची ताटली अधिक आकर्षक आणि वेगळी ठरू शकते. चीजची चकली, चॉकलेटचा गोडवा असलेले मोदक, मखान्याचा पौष्टिक चिवडा, गुलाब-पिस्त्याची करंजी आणि खजूर-ड्रायफ्रूटचे बाइट्स असे पर्याय घरातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडू शकतात. या रेसिपीज करताना केवळ चवच नव्हे, तर पदार्थाचा पोत, योग्य प्रमाण, सजावट आणि साठवण यांचाही विचार केला आहे. प्रत्येक पदार्थासाठी दिलेल्या कृतीतील क्रम पाळल्यास घरच्या घरी हा हटके फराळ तयार करणे सोपे जाईल.

३. मखाना-ड्रायफ्रूट रॉयल चिवडा



तयारीचा वेळ: १० मिनिटे
भाजण्याचा वेळ: १५ मिनिटे
प्रमाण: साधारण ४-५ जणांसाठी.

साहित्य:

मखाना ३ कप, पातळ पोहे १ कप, शेंगदाणे १/२ कप, काजू १/४ कप, बदाम १/४ कप, कढीपत्ता १२-१५ पाने, हिरव्या मिरच्या २ (बारीक कापलेल्या), हळद १/४ चमचा, लाल तिखट १/२ चमचा, साखर १ चमचा (ऐच्छिक), मीठ चवीनुसार, तेल २-३ चमचे आणि भाजलेले तीळ १ चमचा (ऐच्छिक).

कृती:

१. मखाने स्वच्छ, कोरडे आहेत याची खात्री करा. कढईत १ चमचा तेल किंवा तूप घालून मंद आचेवर मखाने ६-८ मिनिटे भाजा.

२. मखाने कुरकुरीत झाले की एका मखान्याचा तुकडा करून पाहा. तो सहज तुटत असेल तर मखाने तयार आहेत. ते ताटात काढून पूर्ण थंड होऊ द्या.

३. त्याच कढईत थोडे तेल घालून शेंगदाणे मंद-मध्यम आचेवर भाजा. ते कुरकुरीत झाल्यावर बाजूला काढा.

४. काजू आणि बदाम वेगवेगळे हलके सोनेरी होईपर्यंत परता. ड्रायफ्रूट जळू नयेत म्हणून सतत ढवळा.

५. कढईत उरलेले तेल घाला. हिरव्या मिरच्या आणि कढीपत्ता घालून मंद आचेवर परता. कढीपत्ता ओलसर राहिला तर चिवडा लवकर नरम होऊ शकतो; तो शक्य तितका कोरडा होईपर्यंत परता.

६. हळद, लाल तिखट आणि मीठ घालून लगेच ढवळा. मसाले जळू नयेत म्हणून आच कमी ठेवा.

७. पातळ पोहे घालून हलक्या हाताने मिसळा. पोहे आधीच भाजलेले नसतील तर ते कुरकुरीत होईपर्यंत मंद आचेवर परता.

८. आता मखाने, शेंगदाणे, काजू, बदाम, साखर आणि तीळ घालून सर्व साहित्य एकत्र करा.

९. गॅस बंद करा. चिवडा पूर्ण थंड झाल्यावरच हवाबंद डब्यात भरा.

महत्त्वाच्या टिप्स : मखाने मंद आचेवर भाजणे महत्त्वाचे आहे; बाहेरून रंग आला पण आतून मऊ राहिले तर चिवडा कुरकुरीत होणार नाही. मीठ आणि मसाल्याचे प्रमाण आपल्या चवीनुसार बदलता येईल. हिरव्या मिरच्या वापरल्यास चिवड्यात ओलावा राहणार नाही याची काळजी घ्या. पूर्ण थंड झाल्यावरच साठवा.



अपर्णा स्वप्निल कांबळे-नांगरे
पत्रकार/फुड ब्लॉगर, मुंबई
मो. ९८९२१३८१३२

४. पिस्ता-गुलाब मिनी करंजी



तयारीचा वेळ: ३० मिनिटे
तळण्याचा वेळ: २०-२५ मिनिटे
प्रमाण: साधारण १२-१५ मिनी करंज्या.

साहित्य:

पारीसाठी: मैदा १ कप, रवा २ चमचे, गरम वितळलेले तूप २ चमचे, चिमूटभर मीठ आणि आवश्यकतेनुसार पाणी.

सारणासाठी: सुके किसलेले खोबरे १/२ कप, बारीक कापलेले पिस्ते १/४ कप, पिठीसाखर १/३ कप, वेलचीपूड १/४ चमचा, खाद्य दर्जाचे गुलाबपाणी १ चमचा आणि तूप १ चमचा.

तळण्यासाठी: आवश्यक तेवढे तेल किंवा तूप.

कृती:

१. एका परातीत मैदा, रवा आणि मीठ एकत्र करा. त्यात गरम वितळलेले तूप घालून हाताने चोळा. मिश्रण मुठीत दाबल्यावर एकत्र राहिले तर तुपाचे प्रमाण योग्य आहे.

२. थोडेथोडे पाणी घालून घट्टसर, गुळगुळीत पीठ मळा. पिठात जास्त पाणी घालू नका; पातळ पीठामुळे करंजी तळताना तेल शोषू शकते किंवा उघडू शकते.

३. पीठ झाकून १५ मिनिटे विश्रांती द्या.

४. सारणासाठी कढईत १ चमचा तूप गरम करून सुके खोबरे मंद आचेवर २-३ मिनिटे परता. ते तपकिरी होऊ देऊ नका. नंतर पूर्ण थंड करा.

५. थंड खोबऱ्यात पिस्ते, पिठीसाखर, वेलचीपूड आणि गुलाबपाणी घालून मिसळा. सारण ओलसर किंवा चिकट वाटल्यास थोडे सुके खोबरे घाला.

६. पिठाचे छोटे समान गोळे करा. प्रत्येक गोळा पातळ, गोल पारीत लाटा. पारीच्या कडा जाड राहू देऊ नका.

७. पारीच्या एका बाजूला १-२ चमचे सारण ठेवा. कडेवर अगदी थोडे पाणी लावा आणि पारी अर्धवट दुमडून कडा नीट चिकटवा.

८. कडा बोटांनी दाबून बंद करा. करंजी कटरने कडा कापा किंवा काट्याने हलके दाब देऊन नक्षी तयार करा. सारण कडांवर लागलेले नसावे; अन्यथा करंजी उघडू शकते.

९. सर्व करंज्या तयार झाल्यावर ओल्या कपड्याऐवजी कोरड्या कपड्याने झाकून ठेवा.

१०. कढईत तेल मध्यम-कमी आचेवर गरम करा. एक करंजी टाकून तपासा. ती हळूहळू वर येत असेल आणि लगेच गडद होत नसेल तर तापमान योग्य आहे.

११. करंज्या थोड्या थोड्या प्रमाणात तळा. मंद-मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळा. खूप मोठी आच ठेवल्यास बाहेरचा भाग लवकर रंगेल पण पारी आतून कच्ची राहू शकते.

१२. करंज्या जाळीदार चाळणीवर काढून पूर्ण थंड करा.

महत्त्वाच्या टिप्स: गुलाबपाणी खाद्य वापरासाठी योग्य असलेलेच वापरा आणि प्रमाण जास्त करू नका. सारणात पिठीसाखर घातल्यानंतर मिश्रण जास्त वेळ गरम करू नका. करंजीची कड नीट बंद करणे हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. पूर्ण थंड झाल्यावरच हवाबंद डब्यात साठवा.

मनोरंजन-उद्बोधनाचा सुंदर समन्वय : 'पाखरांची गाणी'



लहानपणी प्राथमिक शाळेत नवीन पुस्तक हातात पडले म्हणजे त्या पुस्तकाचा सुगंध मनाला मोहून टाकायचा. त्या भारावलेपणात पुस्तकात डोकावले की नजरेस पडायची ती सुंदर देखणी समर्पक चित्रं. ही चित्रं त्या पानावर काय मजकूर आहे, हे वाचायला प्रेरित करायची. मग पानापानावरचा मजकूर ओठांवर खेळायचा आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदवायच्या. हे सारं आठवण्याचं कारण म्हणजे अशीच एक साहित्यकृती हातात पडली. सन्मित्र राजेंद्र दिघे यांचा 'पाखरांची गाणी' हा बालकविता संग्रह. या कवितासंग्रहाने मुखपृष्ठापासूनच मला माझ्या बालपणात नेले आणि माझ्या बालपणातील आठवणी जिवंत केल्या. बालमनांवर चित्रांचा खूप मोठा प्रभाव पडतो. हे तत्व ओळखून पुण्यातील लाडोबा प्रकाशनाने या संग्रहाला सुंदर चित्रांनी नटवले आहे. या चित्रांसोबतच ज्या बालकविता आल्या आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या मनात उत्सुकता, प्रश्न निर्माण करतात आणि विद्यार्थ्यांना विचार करायला भाग पाडतात. हेच या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे.

'पाखरांची गाणी' हा बालकवितासंग्रह बालमनाचे भावविश्व, निसर्गप्रेम, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कारमूल्ये यांचे सुंदर दर्शन घडविणारा आहे. या संग्रहातील कविता वाचताना बालकांच्या निरागस मनाला आनंद तर मिळतोच, तसेच त्यांच्या मनावर चांगले संस्कारही होतात. ते विचार करायला उद्युक्त होतात. स्वतः प्रश्न सोडवू पाहतात. संग्रहातील सोपी भाषा, लयबद्ध रचना, कल्पनारम्य चित्रण आणि उदात्त विचार ही या संग्रहाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

'पक्षी होऊ या' या कवितेत कवीने बालकांना पक्ष्यांप्रमाणे मुक्तपणे विहार करण्याचे आणि उंच आकाशात भरारी घेण्याचे आमंत्रण दिले आहे. हिरवीगार मैदाने पाहणे, झाडांवर बसून गोड फळे खाणे, गाणी गाणे आणि आनंदाने नाचणे या कल्पनांमधून बालमनातील खेळकरपणा आणि स्वातंत्र्याची ओढ व्यक्त होते. या कवितेमुळे मुलांना निसर्गाविषयी प्रेम वाटते.

'खाऊचे झाड' या कवितेत कवीने बालकांच्या कल्पनाविश्वाला गोड साद घातली आहे. अंगणात लावलेल्या झाडाला खाऊ लागतो, ही कल्पना मुलांना आनंद देणारी आहे. आईने आणलेले लाडू, बाबांनी आणलेले खाऊचे पदार्थ आणि मित्रमैत्रिणींबरोबर खाऊ वाटून खाण्याचे प्रसंग यांतून कौटुंबिक जिव्हाळा, मैत्री आणि आनंद व्यक्त होतो. ही कविता बालसुलभ कल्पनाशक्तीचे सुंदर उदाहरण आहे.

'एकलव्य व्हा' या कवितेतून कवीने विद्यार्थ्यांना परिश्रम, जिद्द, ध्येयवाद आणि ज्ञानसाधनेचा संदेश दिला आहे. जीवनात मिळवलेले ज्ञान आणि संस्कार यांच्या बळावर प्रगती करावी, असे कवी सांगतो. नवीन गोष्टी शिकताना जुन्या अनुभवांचा विसर पडू देऊ नये आणि ध्येय साध्य करण्यासाठी एकलव्यासारखी चिकाटी ठेवावी, हा कवितेचा प्रेरणादायी विचार आहे.

'राजमाता' या कवितेत राजमाता जिजाऊंच्या मातृत्वाचा, शौर्याचा, न्यायप्रियतेचा आणि संस्कारक्षम व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला आहे. जिजाऊंनी शिवरायांवर केलेले संस्कार स्वराज्याच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे ठरले. त्यांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या देवरूप मातेप्रमाणे प्रेरणादायी आणि पूजनीय वाटते. मुलांच्या मनात मातृप्रेम, आदर, धैर्य आणि राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे कार्य ही कविता करते.

'सर्वधर्मसमभाव' या कवितेतून कवीने राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता आणि बंधुभाव यांचा संदेश दिला आहे. जात, धर्म आणि पंथ यांतील भेदभाव नष्ट करून सर्वांनी एकत्र यावे, असे कवीचे आवाहन आहे. भारतमाता ही सर्वांची माता असून एकतेतच देशाची खरी शक्ती आहे, हा विचार या कवितेत प्रभावीपणे मांडला आहे.

यांसह संग्रहात रानवाटा, आईची पप्पी, पाऊस, सुट्टीतील मजा, मराठी शाळा, खेळ, पाणी, झाड, निसर्ग, सुट्टया, बाप्पा, मोती, फुले, पुस्तक आणि स्वच्छता या सारख्या मुलाच्या भावविश्वातील विषयांवरच्या कविता त्यांना सजग करणाऱ्या आहेत. या कवितांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मनोरंजनातून संस्कार करण्याची पद्धत. निसर्ग, इतिहास, मैत्री, मातृत्व आणि सामाजिक मूल्ये यांचे चित्रण मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत केले आहे. कवितांसोबत दिलेली रंगीत चित्रे आशय अधिक स्पष्ट करतात आणि बालवाचकांची वाचनाची आवड वाढवतात.

एकंदरीत, दिघे यांचा 'पाखरांची गाणी' हा बालकवितासंग्रह मनोरंजन आणि उद्बोधन यांचा सुंदर समन्वय साधणारा आहे. या संग्रहातून निसर्गप्रेम, देशप्रेम, समता, बंधुभाव, जिद्द आणि उत्तम संस्कार यांची शिकवण मिळते. राजमाता जिजाऊंसारख्या महान व्यक्तिमत्त्वाचे देवरूप दर्शन घडवणारा आणि बालमनाला प्रेरणा देणारा हा संग्रह बालक, पालक आणि शिक्षक या सर्वांसाठी उपयुक्त व आनंददायी आहे.

राजेंद्र दिघे (९४२१६००७११) मालेगाव हे एक हरहुन्नही शिक्षक असून विद्यार्थ्यांम ध्ये समरस होऊन, विद्यार्थ्यांच्या पातळीवर येत विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्यात त्यांचा हातखंड आहे. यासोबत विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी जन समाजामध्ये जनजागृती करून, समाजाकडून विद्यार्थ्यांच्या हितासाठी नवनवीन साहित्य, उपक्रमांची आखणी आयोजन करण्यात त्यांना मोठी गती आहे. पू. साने गुरुजींनी सांगितलेल्या आदर्श शिक्षकाचे सर्व गुण त्यांच्यात आहेत. ज्यांच्या सहवासात आपली वाटचाल सुरू आहे, अशा गोड चिमुकल्या पाखरांना त्यांनी हे पुस्तक अर्पण केले आहे. यातच सर्व आले ! पुण्याच्या प्रसिद्ध अशा लाडोबा प्रकाशनाने हा संग्रह प्रकाशित केला असून ३२ पानांच्या या संग्रहात एकूण २४ कविता आहेत. विद्यार्थ्यांपुढे भाराभर देण्यापेक्षा त्यांना सकस, दर्जेदार आणि जीवनात उपयोगी पडणारं विचारांचे धन या संग्रहात आहे. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे अत्यंत बोलकं मुखपृष्ठ आणि कवितांना सजीव करणारी आतील चित्रे सरदार जाधव यांनी काढलेली आहेत. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भूसे यांनी संग्रहाची पाठराखण केली आहे. दिघे यांची ग्रामीण लेकरांसंबधीत बांधिलकी प्रेरक असल्याचे ते म्हणतात. संग्रहाचे मूल्य १०० रुपये असून प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये हे पुस्तक संग्रही ठेवावं असंच आहे. मी सन्मित्र राजेंद्र दिघे यांना त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी आभाळभर शुभेच्छा व्यक्त करतो!



प्रा.बी.एन.चौधरी
देवरुप, नेताजी मार्ग
धरणगाव जि. जळगाव
मो. ९४२३४९२५९३)

दैनिक लोकशाही
जळगाव next
४
मुंबई, शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६
epaper.lokshahilive.com

वृद्ध शेतकऱ्याची शेतजमीन हडपल्याचा प्रकार

लोकशाही न्यूज नेटवर्क
मलकापूर ✍ प्रतिनिधी

वृद्ध शेतकऱ्याच्या नावाचा खोटा अंगठा वापरून, बनावट हिबानामा (बक्षीसपत्र) तयार करून आणि महसूल यंत्रणेची दिशाभूल करून सुमारे ०.७५ हेक्टर शेतजमीन परस्पर नावावर करून घेतल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी अजीमोदीन मोहम्मद मुनिरोद्दीन (वय अंदाजे ७० वर्षे, रा. मलकापूर) यांनी शहर पोलीस ठाणे, मलकापूर येथे लेखी तक्रार सादर करून संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, मौजे मलकापूर भाग-२ मधील गट क्र./सर्व्हे क्र. ३४०/२ मधील ०.७५ हे.आर. जमीन अजीमोदीन यांच्या मालकीची व वहिवाटीतील आहे. संशयित आरोपी मोहम्मद नवेद मोहम्मद जहीरोद्दीन याने इतर साथीदारांशी संगनमत करून ही जमीन हडप करण्याच्या उद्देशाने ५०० रुपयांच्या मुद्रांकावर एक बनावट व संशयास्पद हिबानामा तयार केला. तक्रारदाराने आपण स्वतः कोणालाही अशी जमीन हिबा (दान) केलेली नाही, असा स्पष्ट दावा केला आहे.

महत्वाचे

अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी अटक

लोकशाही न्यूज नेटवर्क
भुसावळ– भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका अल्पवयीन मुलीशी संबंधित गुन्ह्यात तपासादरम्यान लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पोक्सो) तसेच भारतीय न्याय संहितेतील () अत्यंत गंभीर कलमे वाढविण्यात आली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत शेख अशपाक शेख मुस्ताक (वय २८, रा. फकीरवाडा, जाम मोहल्ला, भुसावळ) या मुख्य आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरुवातीला याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला होता. परंतु, तपासाची व्याप्ती वाढल्यानंतर आणि पीडितेच्या जबाबातून समोर आलेल्या गंभीर बाबींनुसार या गुन्ह्यात बीएनएसचे कलम ६४(२)(एम) तसेच पोक्सो कायदा २०१२ मधील कडक कलमे (कलम ४, ५(एल) आणि ६) वाढविण्यात आली. या संवेदनशील प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन बाजारपेठ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राहुल वाघ यांनी या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक राहुल तायडे यांच्याकडे वर्ग केला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या विशेष शोधपथकाने तातडीने सूत्रे हलवत आरोपीचा शोध सुरू केला. तपासादरम्यान आरोपी शेख अशपाक हा पोलिसांच्या हाती लागला आणि या गुन्ह्यात त्याचा थेट सहभाग निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली.

फैजपूरमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ : ऐवज लंपास

फैजपूर – शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घातला असून, प्रसिद्ध खंडेराव वाडी देवस्थानाच्या मागील परिसरातील एकाच वेळी तीन घरांना लक्ष्य करत घरफोडी केली. शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ रोजी ही घटना उघडकीस आली. या चोरीत सोन्याचे दागिने, रोख रक्कम यासह लाखो रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, खंडेराव वाडी देवस्थानाच्या मागील भागातील तीन घरांचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. यामध्ये धनराज मनोहर बडगुजर यांच्या घरातून सर्वाधिक सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने घरफोडी करून लाखोंचा ऐवज लंपास केला आणि घटनास्थळावरून पोबारा केला. घटनेची माहिती मिळताच फैजपूर पोलीस स्टेशनचे एपीआय संदीप पाटील यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. याप्रकरणी फैजपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांकडून घटनेचा तपास केला जात आहे. चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा नेमका आकडा आणि इतर तपशील तपासानंतर स्पष्ट होणार आहेत. एकाच परिसरातील तीन घरांमध्ये एकाच वेळी घरफोडी झाल्याने फैजपूर शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जैन इरिगेशनचा 'सुपरक्रिटिकल' कंपनीसोबत महत्त्वपूर्ण करार

१९ हजार टन बायोचार कार्बन क्रेडिट्सचा करणार पुरवठा

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

कृषी आणि सिंचन क्षेत्रातील आघाडीची कंपनी 'जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड'ने पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले आहे. कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कार्बन रिमूव्हल मार्केटप्लेस 'सुपरक्रिटिकल' सोबत एक धोरणात्मक करार केला आहे. या करारांतर्गत जैन इरिगेशन २०२६-२७ या कालावधीत तब्बल १९,००० टनांपर्यंतच्या 'बायोचार कार्बन रिमूव्हल क्रेडिट्स'चा पुरवठा करणार आहे. हे कार्बन क्रेडिट्स जैन इरिगेशनच्या जळगाव (महाराष्ट्र) येथील अत्याधुनिक औद्योगिक बायोचार प्रकल्पातून तयार केले जातील. या प्रकल्पात शेतीचा कचरा आणि अन्न प्रक्रिया उद्योगातून निघणाऱ्या अवशेषांवर 'गॅसिफिकेशन' प्रक्रियेद्वारे प्रक्रिया केली जाते. यातून 'बायोचार' (एक प्रकारचा कोळसा) तयार होतो, जो जमिनीत गाडल्यास हवेतील घातक कार्बन अनेक शतकांपर्यंत जमिनीत सुरक्षित लॉक करून ठेवतो. यामुळे पर्यावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करण्यास मोठी मदत होते. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या सर्व घटकांचा पुनर्वापर केला जातो. प्रक्रियेदरम्यान तयार होणारा 'सिनगॅस' जैन इरिगेशनच्या कारखान्यांमध्ये जीवाश्म



इंधनाचा पर्याय म्हणून वापरला जातो. तर तयार झालेला बायोचार कंपनीच्या कृषी व्यवसायांमध्ये आणि स्थानिक शेतकऱ्यांना जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी दिला जातो. यामुळे कंपनीचा नवीन प्रकल्पांसाठी लागणारा भांडवली खर्च तर वाचलाच आहे, शिवाय कचऱ्यातून संपत्ती निर्मितीचे एक आदर्श मॉडेल उभे राहिले आहे. सुपरक्रिटिकल कंपनीचे पुरवठा व्यवस्थापक स्टीव्ह मॉरिन यांनी सांगितले की, ''इतर कंपन्यांना बायोचार प्रकल्पांसाठी पुरवठा साखळी शून्यातून उभी करावी लागते. मात्र, जैन इरिगेशनकडे ६० वर्षांहून अधिक काळचे मजबूत नेटवर्क आणि १ कोटींहून अधिक शेतकऱ्यांचा आधार आहे. जैन इरिगेशन ही जगातील सर्वात मोठी मँगो प्रोसेसिंग (आंबा प्रक्रिया) कंपनी आणि दरवर्षी १५ कोटी रोपांची निर्मिती करणारी टिश्युकल्चर नर्सरी चालवते. त्यामुळे त्यांना कच्चा माल आणि वितरणासाठी कोणतीही अडचण नाही.''

बाजारात वाढती मागणी

सुपरक्रिटिकलच्या ताज्या अहवालानुसार, जागतिक स्तरावर उच्च दर्जाच्या बायोचार क्रेडिट्सची मागणी प्रचंड वाढली आहे. २०२६ च्या एकूण उपलब्ध कोट्यापैकी ८१% कोटा जुलै महिन्यातच बूक झाला होता, जो गेल्या वर्षाच्या तुलनेत ३ महिने आधीच संपला आहे. कॉर्पोरेट कंपन्या आता एका वेळच्या खरेदीऐवजी जैन इरिगेशनसारख्या विश्वासू कंपन्यांसोबत बहु-वार्षिक करार करत आहेत. या प्रकल्पाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी सध्या जागतिक पातळीवरील 'Puro.earth' द्वारे पडताळणी सुरू असून, 'BeZero Carbon' कडून स्वतंत्र मानांकन (Rating) देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

मनपाच्या बालवाडीला सुविधा पुरवण्यासह, कचरामुक्त वॉर्डसाठी प्रशासनाला कडक निर्देश



लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

'महापौर स्वच्छता संकल्प अभियान' अंतर्गत शुक्रवारी, दिनांक ३० ऑक्टोबर रोजी महापौर दीपमाला काळे यांनी वार्ड क्रमांक १३ मध्ये प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान वॉर्डातील स्वच्छता, रस्ते, गटारी आणि मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेत त्यांनी संबंधित विभागांना तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले. या पाहणी प्रसंगी स्थानिक नगरसेवक नितीन सपके, वैशाली पाटील, प्रफुल्ल देवकर, सुरेखा तायडे यांच्यासह आरोग्य विभागाचे प्रमुख समीर बोरोले, बांधकाम विभागाचे अभियंता विजय मराठे, पाणीपुरवठा विभागाचे धम्मरत्न बाविस्कर तसेच इतर अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरटीओ कार्यालयाच्या पुढील बाजूस डी मार्ट रस्त्यावर सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेचा म हापौरांनी आढावा घेतला. तसेच, परिसरातील मोकळ्या प्लॉटमध्ये वाढलेले तण आणि अस्वच्छता तातडीने जेसीबीच्या सहाय्याने साफ करण्याचे निर्देश त्यांनी दिले. गणपती मंदिराजवळ नागरिकांच्या मागणीनुसार नवीन पथदिवे आणि गतिरोधक बसवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या. आदर्श नगर, रवींद्र नगर, मोहन नगर आणि नूतन वर्षा कॉलनी परिसर या भागांमध्ये पाहणी करून रस्त्यांवर व गटारींमध्ये साचलेल्या कचऱ्याची पाहणी करण्यात आली. हा कचरा तत्काळ उचलून परिसर स्वच्छ करण्याचे निर्दे श आरोग्य विभागाला देण्यात आले. रवींद्र नगर येथील महानगरपालिकेच्या बालवाडीच्या पुढील व मागील बाजूस पूर्णपणे वाढलेली झाडेझुडपे काढून स्वच्छता करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले. तसेच, अतिशय सुंदर असलेल्या या बालवाडीमध्ये पाण्याची सुविधा पुरवणे, मुलांसाठी प्रसाधनगृह बांधणे आणि परिसरात पेव्हर ब्लॉक बसवणे याबाबत आढावा घेऊन उभारण्याबाबत सूचना बांधकाम विभागाला दिल्या. वॉर्डात साफसफाईसाठी उपलब्ध झालेल्या वाहनांचा जास्तीत जास्त वापर करून गटारी, मोकळे प्लॉट आणि रस्त्यांवरील कचरा नियमित उचलला जावा, जेणेकरून वॉर्ड पूर्णपणे स्वच्छ व सुंदर होईल, असे आवाहन महापौरांनी केले.

वरणगावात निवडणुक विजयाचा जल्लोष

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव ✍ प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवल्याबद्दल शहरातील महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यानी. आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या विजयामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. विधान परिषद निवडणुकीच्या निकालात महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी बाजी मारल्याची माहिती समजताच, महाविकास आघाडीच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी तसेच



कार्यकर्त्यांनी बस स्थानक चौकात एकत्र येऊन आनंद व्यक्त केला. यावेळी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत विजयाचा आनंद साजरा करताना उपस्थितांनी फटाके फोडले आणि उपस्थितांना पेढे वाटून तोंड गोड करत एकमेकांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या. या आनंदोत्सवात प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष योगेंद्रसिंग पाटील, अशापक काझी, राहुल जोहरे, सुनिल भोई, दिपक मराठे, पंकज पाटील, शैलेंद्र बोदडे, मनोज देशमुख, प्रतिभा तावडे, धनश्री झांबरे, संजय कोळी, प्रकाश भैसे, अशोक इंगळे, सुभाष हळदे, डॉ एहसान, अमोल पाटील, मनोज अग्रवाल, शे हनिफ, शोएब खाटीक, जीशान शेख आदीसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच म हाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोंढे जगदंबा विद्यालयचा विज्ञान प्रकल्प प्रदर्शनात प्रथम



लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव ✍ प्रतिनिधी

येथील स्वातंत्र्य सैनिक कैलासवासी रावसाहेब निकम उच्च माध्यमिक व जगदंबा माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे विद्यालयाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

चाळीसगाव येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. गटशिक्षणाधिकारी विलास भोई, शिक्षण विस्तार अधिकारी जितेंद्र महाजन यांच्या उपस्थितीत नगराध्यक्षा प्रतिभाताई मंगेश चव्हाण यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. 'शाश्वत आणि विकसित भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष' हा प्रदर्शनाचा मुख्य विषय होता. विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी 'लोरा तंत्रज्ञानावर आधारित रिअल-टाइम पूर व भूस्खलन पूर्वसूचना प्रणाली' हा नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केला. नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना वेळेत मिळाल्यास जीवित व वित्तहानी टाळता येऊ शकते, या संकल्पनेवर आधारित प्रकल्पाला परीक्षकांनी प्रथम क्रमांक दिला. परीक्षक म्हणून पी. एम. अमृतकर, ए. पी. साळुंखे आणि पंकज पाटील यांनी काम पाहिले. विज्ञान विभागप्रमुख एस. डी. अमृतकर, विज्ञान शिक्षिका पी. ए. शितोळे आणि हिमांशू जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. कलाशिक्षक वैभव निकम यांनी प्रकल्पाची रचना व मांडणीसाठी विशेष परिश्रम घेतले. इयत्ता अकरावीतील कीर्ती निकम, वैष्णवी चौधरी तसेच दहावीतील भावना निकम, खुशाली खैरनार आणि मयुरी चौधरी यांनी प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण केले. या यशाबद्दल प्राचार्य डी. डी. सोनानिस यांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. संस्थाध्यक्ष दादासाहेब टी. पी. निकम, सचिव बापूसाहेब अनिल निकम, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्गानेही कौतुक करून जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

जळगावात १ नोव्हेंबरला 'अवतारम्' कथक नृत्यसंध्या

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, जळगाव जिल्हा शाखा आणि कलादर्पण यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता 'अवतारम्' या विशेष कथक नृत्य संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.

एम. जे. कॉलेज परिसरातील कालिदास सभागृहात हा शास्त्रीय नृत्याचा भव्य सोहळा रंगणार आहे. या कार्यक्रमात शहरातील प्रख्यात नृत्यांगना डॉ.



महिमा मिश्रा अय्यंगार आणि त्यांच्या शिष्या कथक नृत्यातून विविध रूपांतील भगवान विष्णू यांच्या ९ अवतारांवर आधारित 'अवतारम्' ही संकल्पना रंगमंचावर साकारणार आहेत. भारतीय शास्त्रीय नृत्याची समृद्ध परंपरा, लय आणि भावमुद्रांचा अप्रतिम संगम या सादरीकरणातून रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. या सोहळ्यास प्रवेश विनाम ूल्य असून, जळगावातील सर्व रसिक प्रेक्षक, कलावंत आणि नृत्यप्रेमींनी या देखण्या शास्त्रीय नृत्य सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जळगाव जिल्हा शाखेचे उपाध्यक्ष ॲड. संजय राणे आणि कलादर्पणचे उपाध्यक्ष पद्मनाभ अय्यंगार वतीने करण्यात आले आहे.

आकाशकंदील निर्मिती व दीपसजावट उपक्रम

लोकशाही न्यूज नेटवर्क
पाचोरा ✍ प्रतिनिधी

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित, श्री. गो. से. हायस्कूल, पाचोरा येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आकाशकंदील निर्मिती व दीपसजावटीचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात इयत्ता पाचवी ते सातवी म धील विद्यार्थ्यांनी घोटीव कागदापासून आकर्षक आकाशकंदील तयार केले. तसेच जुन्या वर्तमानपत्रांचा कल्पकतेने वापर करून विविध सजावटीच्या वस्तू बनविल्या आणि दिव्यांची सुंदर सजावट केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा,



कलात्मक कौशल्याचा आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार घडवून आणला. टाकाऊ कागदांचा पुनर्वापर करून सुंदर वस्तू तयार करण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निम र्ण करणे, हस्तकलेची आवड जोपासणे आणि स्वनिर्मितीचा आनंद अनुभवण्याची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आर. एल. पाटील, उपमुख्याध्यापक पी. एम. पाटील, पर्यवेक्षिका अंजली गोहिल, ज्येष्ठ शिक्षिका एस. एस. पाटील, सांस्कृतिक प्रमुख रवींद्र बोरसे, रुपेश पाटील, सुबोध कांतायन उपस्थित होते. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक प्रमोद पाटील, ज्योती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

सातगाव डोंगरीत भागवत कथेच्या भक्तीरसात न्हाले भाविक

लोकशाही न्यूज नेटवर्क
पाचोरा ✍ प्रतिनिधी

येथील गौलोक धाम येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय श्रीमद् भागवत कथा व गौ वसुबारस महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी २८ ऑक्टोबर रोजी ह. भ. प. विजय महाराज फड (माजी जिल्हाधिकारी) यांचे 'भाव' या विषयावर अत्यंत प्रभावी कीर्तन झाले. भाव असेल तरच देव भेटतो, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. गीतेतून दिला जीवनाचा बोध – यावेळी बोलताना महाराज म्हणाले, भगवान श्रीकृष्णाने कुरुक्षेत्राच्या रणांगणावर अर्जुनाला भगवद्गीता सांगून



जीवनाचे सार समजावून सांगितले. अर्जुनाप्रमाणेच आज प्रत्येक माणूस मोह, माया आणि चिंतेत अडकला आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी गीतेचा अभ्यास आवश्यक आहे. 'तुझे आहे तुझ्यापाशी, परी तू जागा चुकलासी' हा संतांचा अभंग सांगत त्यांनी सांगितले की, देव आपल्यापासून दूर नाही, तर तो आपल्याच आत आहे. मात्र आपण चुकीच्या ठिकाणी त्याला शोधत आहोत. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' – जगात जे मिळाले आहे त्यात समाधान मानावे, मात्र प्रयत्न करणे सोडू नये, 'ठेविले अनंते तैसेची रहावे' याचा अर्थ आळशी बनणे नाही, तर आहे त्या परिस्थितीत प्रयत्नवाद कायम ठेवणे आहे, असे मार्मिक विवेचन त्यांनी केले. महाराजांच्या ओघवत्या वाणीतून निघणाऱ्या कीर्तनाने संपूर्ण गौलोक धाम परिसर भक्तीमय झाला होता. टाळ, मृदंगाच्या गजरात भाविकांनी 'जय हरी' चा जयघोष केला. या सोहळ्याप्रसंगी कथाकार प. पू. गोपालकृष्ण व्यास शास्त्री, यजमान अमरसिंह गणपत परदेशी, माजी जि. प. सदस्य मधुकर काटे, उद्धव मराठे, उद्योजक रमेश मोरे, सरपंच योगेश पाटील, किसन बडे महाराज, गोसेवक ज्ञानेश्वर माऊली, देविदास वाघ व पंचक्रोशीतील हजारो भाविक उपस्थित होते.

चाळीसगावात ३०० बंदी क्षमतेचे खुले कारागृह मंजूर

आ. मंगेश चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश : बिलाखेड शिवारात उभारणार सर्व सोयी-सुविधायुक्त कारागृह

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव ✍ प्रतिनिधी

चाळीसगावच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय झाला असून, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने चाळीसगाव येथे ३०० बंदी क्षमतेचे खुले जिल्हा कारागृह स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला. हे कारागृह शहराजवळील बिलाखेड शिवारात उभारण्यात येणार आहे. या मंजुरीसाठी आमदार मंगेश चव्हाण यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांनी



१५ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र देऊन चाळीसगाव येथे कारागृह मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. प्रस्तावित जागेची कारागृहे व सुधारसेवा विभागाच्या महासंचालकांनी स्थळपाहणी करून अहवाल शासनाला सादर केला होता. या ठिकाणी आवश्यक जागेसह शासकीय रुग्णालय, न्यायालयीन सुविधा आणि वाहतुकीची सोय उपलब्ध असल्याने कारागृह उभारण्यासाठी ही जागा योग्य असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या कारागृहात ३०० बंदी क्षमतेच्या बॅरेक्स, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने तसेच आवश्यक सर्व सुविधा उभारण्यात येणार आहेत. बांधकामाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडे (एमएसआयडीसी) देण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील विद्यमान जिल्हा कारागृहानंतर चाळीसगाव हे दुसरे कारागृह ठरणार आहे. यासोबतच प्रस्तावित अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीमुळे कारागृह प्रशासन आणि न्यायालयीन व्यवस्थेतील समन्वय अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. आमदार मंगेश चव्हाण यांच्या प्रयत्नातून यापूर्वी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय आणि अपर जिल्हाधिकारी कार्यालय यांसारख्या महत्त्वपूर्ण सुविधा चाळीसगावात मंजूर झाल्या आहेत. आता खुल्या कारागृहाची भर पडल्याने शहराच्या जिल्हास्तरीय सुविधांमध्ये आणखी वाढ झाली आहे. या निर्णयाबद्दल आमदार मंगेश चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि कारागृह विभागाचे पोलिस महासंचालक सुहास वारके यांचे आभार मानले आहेत.

जळगाव कारागृहावरील ताण कमी होणार!

जळगाव शहरात १९६२ पासून २७४ बंदी क्षमतेचे जिल्हा कारागृह कार्यरत आहे. मात्र, ३१ जुलै २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार येथे प्रत्यक्षात ४७४ बंदी होते. त्यामुळे निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक बंदी असल्याने कारागृह व्यवस्थापनावर ताण निर्माण झाला होता. ही अतिगर्दी कमी करण्याच्या दृष्टीने चाळीसगाव येथे नवीन खुले कारागृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दैनिक लोकशाही
जळगाव next
५
मुंबई, शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६
epaper.lokshahilive.com

अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; मुद्देमाल जप्त

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर कारवाई करत मेहुणबारे पोलिसांनी १४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २९ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. याप्रकरणी महेश दिनकर सूर्यवंशी याच्याविरुद्ध मेहुणबारे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना विशेष पथके तयार करून कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मेहुणबारे पोलीस ठाण्याच्या प्रभारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक सहयाद्री बिलें यांनी पथकाला अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध कारवाईच्या सूचना दिल्या. २९ रोजी गोपनीय बातमीदारामार्फत कळमडू गावातील कुंभार रोडलगत महेश सूर्यवंशी हा अवैधरीत्या वाळूची वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. वैध पास किंवा परवाना नसताना डंपरम धून शासकीय गौण खनिज वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळले. पोलिसांनी डंपरसह वाळू जप्त केली.

जळगावच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने प्रयत्न करु

पालकमंत्री गुलाबराव पाटील : मध्यवर्ती कचरा संकलन व हस्तांतरण केंद्रासह आधुनिक अग्निशमन दुचाकीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

शहराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे आणि अग्निसुरक्षेच्या सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शहराचा विकास केवळ जिल्हा नियोजन समितीच्या निधीपुरता मर्यादित न ठेवता शासनाकडूनही अधिकाधिक निधी मिळवण्यासाठी मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे संयुक्तपणे पाठपुरावा करू, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. जळगाव स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित बनवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



जळगाव शहर महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जुन्या टी. बी. सॅनिटोरियम परिसरात उभारण्यात आलेल्या मध्यवर्ती कचरा संकलन व हस्तांतरण केंद्राचे (ट्रान्सफर स्टेशन) तसेच आधुनिक अग्निशमन दुचाकीचे लोकार्पण गुरुवारी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, महापौर दिपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती चंद्रशेखर पाटील आणि महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे उपस्थित होते.

शहरातील स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा व पथदिव्यांच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. विमानतळ ते अजिंठा चौफुलीदरम्यान सौर पथदिव्यांसाठी जिल्हा नियोजन समितीतून पाच कोटींचा निधी उपलब्ध करून दिला असून कामे दर्जेदार व मुदतीत पूर्ण करून नियमित देखभाल करावी, असे त्यांनी सांगितले. अंगणवाडी इमारतींसह नागरिकांच्या गरजेनुसार आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक कामांना प्राधान्य देण्याचेही निर्देश दिले. अरुंद गल्लीबोळांतील आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आधुनिक अग्निशमन दुचाकी उपयुक्त ठरणार असल्याचे सांगत त्यांनी ती स्वतः चालवून पाहिली. कचरा संकलन केंद्राची पाहणी करून महापालिका आयुक्त आदित्य जिवने (भा.प्र.से.) व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले.

महापौर दिपमाला काळे यांनी हे केंद्र शहराच्या स्वच्छता व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. आधुनिक अग्निशमन दुचाकीमुळे अरुंद गल्लीबोळांत तातडीने मदत पोहोचवता येईल, असेही त्यांनी नमूद केले. आमदार राजूमामा भोळे यांनी शहर स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करण्याचे आवाहन केले. व्यापाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर मंत्री गिरीश महाजन व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी संयुक्तपणे प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. खासदार स्मिता वाघ यांनी रेल्वे स्थानक परिसर कचरामुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची तसेच बायपास परिसरातील अपघात रोखण्यासाठी नियमित देखरेख व उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महापालिका आयुक्त आदित्य जिवने यांनी प्रकल्पाची माहिती दिली. सूत्रसंचालन विजयकुमार सोनवणे यांनी केले, तर उपायुक्त निर्मला गायकवाड-पेखळे यांनी आभार मानले. यावेळी नगरसेवक विष्णू भंगाळे, सुनील खडके, अरविंद देशमुख, गणेश सोनवणे, हर्षल मावळे, सागर सोनवणे, दिलीप पोकळे, पियुष कोल्हे, प्रकाश पाटील, वैशाली पाटील, नितीन सपके, नरेंद्र पाटील, अमर जैन, चेतन शिरसाळे, निलेश तायडे, कुंदन काळे, गजानन देशमुख, राहुल पाटील, आशुतोष पाटील, सुरेश कापसे, विजय जगताप यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

आधुनिक सुविधांमुळे कचरा व्यवस्थापनाला गती

मध्यवर्ती केंद्रात घंटागाड्यांद्वारे संकलित कचरा एकत्र करून गार्बेज कॉम्पॅक्टरच्या साहाय्याने संकुचित केला जाणार आहे. यासाठी स्वतंत्र रॅम्प, वजनकाटा, दूषित पाण्याच्या व्यवस्थापनाची सुविधा आणि सर्व ऋतूंमध्ये वापरता येणारे आच्छादित शेड उपलब्ध आहे. त्यामुळे कचरा संकलन व वाहतूक अधिक जलद आणि कार्यक्षम होणार आहे.

महत्वाचे

जळगाव विभागात ५ नोव्हेंबर रोजी डाक अदालत

जळगाव : टपाल सेवांशी संबंधित नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी अधीक्षक डाकघर, जळगाव विभाग यांच्यातर्फे दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. डाक विभागामार्फत नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यात येतात. या सेवांबाबत नागरिकांना येणाऱ्या अडचणी व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने डाक अदालत आयोजित करण्यात येते. यामध्ये डाक विभागाचे अधिकारी तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्या लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न करतात.

या डाक अदालतीमध्ये टपाल, स्पीड पोस्ट, काउंटर, सेवा, डाक वस्तू,पार्सल, बचत बँक, मनीऑर्डर आदी डाक सेवांशी संबंधित ज्या तक्रारींचे निराकरण तक्रार दाखल केल्यापासून सहा आठवड्यांच्या कालावधीत झालेले नाही, अशा तक्रारींची दखल घेतली जाणार आहे. तक्रारीमध्ये तक्रारदाराचे नाव, पत्ता, तक्रारीचा विषय, तक्रार केल्याची तारीख तसेच ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार पाठविण्यात आली आहे, त्या अधिकाऱ्याचे नाव व पद नमूद करणे आवश्यक आहे. संबंधितांनी डाकसेवेसंबंधीची तक्रार दोन प्रतीत, अतिरिक्त प्रतीसह टी. एफ. तडवी, सहाय्यक अधीक्षक (मुख्यालय), अधीक्षक डाकघर यांचे कार्यालय, १ ला माळा, हेड पोस्ट ऑफिस बिल्डिंग, जळगाव - ४२५००१ या पत्त्यावर दि. ०२ नोव्हेंबर २०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. नंतर प्राप्त झालेल्या तक्रारींवर आवश्यक ती कारवाई केली जाईल; मात्र त्यांचा डाक अदालत अंतर्गत विचार केला जाणार नाही, असे अधीक्षक डाकघर, जळगाव विभाग, जळगाव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळिवले आहे.

सैनिकी मुलांच्या वसतिगृहात सहायक अधीक्षक पद भरती

जळगाव : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जळगाव यांच्या अधिपत्याखाली कार्यरत सैनिकी मुलांचे वसतिगृह, जळगाव येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर वसतिगृह सहायक अधीक्षक (पुरुष) या पदासाठी भरती करण्यात येणार आहे. ही पद माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार असून, माजी सैनिक प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास नागरी उमेदवारांचा विचार करण्यात येणार आहे. या पदासाठी एक जागा असून, माजी सैनिक प्रवर्गातील एमएसीपी हवालदार, नायब सुभेदार किंवा त्यापेक्षा मोठ्या पदावरून निवृत्त झालेले हवालदार/जेसीओ यांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच मराठी व इंग्रजी टायपिंग, एमएस ऑफिस आणि एमएस एक्सेलचे ज्ञान असलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील. इच्छुक उमेदवारांनी आधारकार्ड, बँक पासबुक, रहिवासी दाखला, दोन फोटो तसेच माजी सैनिकांसाठी ओळखपत्र व डिस्चार्ज बुक या आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जळगाव येथे सादर करावेत. मुलाखतीची तारीख नंतर कळिवण्यात येईल. निवड करण्याचे अथवा कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता निकाली काढण्याचे सर्व अधिकार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जळगाव यांनी राखून ठेवले आहेत. अधिक माहितीसाठी ०२५७-२२४१४१४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत कळिवण्यात आले आहे.

फत्तेपूर येथे डॉ.पाटील होमिओपॅथिक कॉलेजतर्फे आरोग्य तपासणी शिबिर

लोकशाही न्यूज नेटवर्क
फत्तेपूर ता. जामनेर ✍ प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासह आरोग्यविषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने डॉ. उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, जळगाव यांच्या वतीने २८ ऑक्टोबर रोजी फत्तेपूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उदघाटन भाजपचे जेष्ठ नेते जे. के. चव्हाण यांनी केले. या प्रसंगी डॉ. अरूण फिरके, बबलूशेठ भन्साळी, पंचायत समितीचे उपसभापती एकनाथ लोखंडे, उपसरपंच आत्माराम गावंडे, डॉ. सुराजसिंग पाटील, ग्रामपंचायत अधिकारी अमोल देशमुख व इतर मान्यवर उपस्थित होते. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हे शिबिर पार पडले. शिबिरात नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार होमिओपॅथिक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. तसेच आयुष्मान भारत योजना व अन्य शासकीय आरोग्य योजनांची माहिती देऊन पात्र रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया व उपचारांचा लाभ मिळिवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना योग्य उपचारांची माहिती मिळावी आणि आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या शिबिरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विद्यानंद आठवले, प्रा. डॉ. सचिन पाटील, डॉ. विनायक विलायते, डॉ. सरगम सिंग, डॉ. तुबा नाझ व इंटर्न्स तसेच सह-इंटर्न्स यांनी सहभाग घेतला. वैद्यकीय पथकाने ग्रामस्थांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी राजीव तायडे, पुंडलिक पाटील, प्रेम ठेलर, प्रह्लाद पाटील, अनिल आप्पा, अरुण कोळी आदींनी परिश्रम घेतले.



डॉ. मयूर पाटील यांना आर्थोपेडिकचे गोल्ड मेडल

लोकशाही न्यूज नेटवर्क
चोपडा ✍ प्रतिनिधी

येथील चंदागौरी नगरातील रहिवासी तथा अंबाडे शाळेचे मुख्याध्यापक राजेश उत्तमराव पाटील यांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. मयूर विद्या राजेश पाटील यांनी आर्थोपेडिक विषयात एम.बी.बी.एस.नंतर एम.एस. पदव्युत्तर वैद्यकीय पदवी आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथून प्रथम क्रमांकाने प्राप्त केली आहे. महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवत त्यांनी गोल्ड मेडल पटकावले आहे. त्यांच्या यशामुळे चोपडा शहरासह शिक्षक समाजात आनंदाचे वातावरण आहे.



डॉ. मयूर यांच्या या यशामुळे चोपडा तालुका तसेच विरावलीकर क्षीरसागर परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या यशाबद्दल ग.स.चे अध्यक्ष-उपाध्यक्ष व स्थानिक संचालक सुनील सूर्यवंशी, योगेश सनेर, मंगेश भोईटे, एकनाथ पाटील, माजी ग.स. संचालक रमेश शिंदे, शिक्षक नेते आर.एच. बाविस्कर, उपप्राचार्य डॉ. के.एन. सोनवणे, प्रमोद देवरे, प्रशांत सोनवणे, गुरुदत्त निंबाळे, मोहन महाजन, शामकांत पाटील, नितीन सोनवणे तसेच सहकार गटाचे अध्यक्ष उदय पाटील आणि संपूर्ण ग.स. कार्यकारी मंडळाने अभिनंदन केले आहे.

याशिवाय जळगाव जिल्ह्यातील शैक्षणिक, सामाजिक, सहकार, राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडूनही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

गोठ्यातून गाय चोरणाऱ्या तिघांना अटक

४० हजार रुपयाचे नुकसान: गुन्हा दाखल

लोकशाही न्यूज नेटवर्क
रावेर ✍ प्रतिनिधी

तालुक्यातील शिंदखेडा येथे गोठ्यातून ४० हजार रुपये किमतीची गाय चोरून नेल्याप्रकरणी रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने तीन आरोपींना अटक केली. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या चोरीचा छडा लावला.

संतोष देविदास पाटील (वय ४२, रा. शिंदखेडा, ता. रावेर) हे शेती व दुग्धव्यवसाय करतात. त्यांच्या घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये दोन गायी व तीन म्हशी बांधलेल्या होत्या. २८ ऑक्टोबर रोजी रात्री १.३० वाजेच्या सुमारास गोठ्यातून गुरांचा आवाज आल्याने ते पाहण्यासाठी गेले असता, तपकिरी रंगाची व मोठी शिंगे असलेली गाय गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. सुमारे ४० हजार रुपये किमतीची ही गाय अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची फिर्याद त्यांनी रावेर पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक ४७९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी सुधारणा अधिनियम १९९५ मधील कलम ५ व ५ (सी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच गोपनीय बातमीदारांकडून माहिती मिळवून संशयितांची ओळख पटवली. चौकशीदरम्यान त्यांनी गाय चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींमध्ये शेख मुस्ताक शेख इसाक (वय ३८, रा. कुरेशी मोहल्ला, रसूलपूर, हल्ली मुक्काम मदिना कॉलनी, रावेर), शेख अक्रम शेख असलम (वय २५, रा. जुनी नगरपालिका समोर, इमामवाडा, रावेर) आणि शेख समीर शेख कलीम (वय २६, रा. मदिना कॉलनी, रावेर) यांचा समावेश आहे.

सुरक्षित बालपण अभियानांतर्गत पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती

लोकशाही न्यूज नेटवर्क
केऱ्हाळे बु., ता. रावेर ✍ प्रतिनिधी

तालुका विधी सेवा समितीच्या वतीने सुरक्षित बालपण अभियानांतर्गत दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी केऱ्हाळे बुद्रुक येथील कै. दत्तू सोनजी पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती शिबिर घेण्यात आले. बालकांचे शोषण थांबवून त्यांना सुरक्षित वातावरण देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन दिवाणी व फौजदारी न्यायालय, रावेर येथील न्यायाधीश व्ही. व्ही. जटाळ यांनी केले.

यावेळी रावेर तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. धनराज पाटील, सचिव ॲड. के. बी. खान, ज्येष्ठ विधिज्ञ रमाकांत महाजन, निलेश महाजन, प्रमुख वक्ते तुषार माळी, जे. व्ही. दांडगे, प्रमुख पाहुणे ॲड. समशेर अली, सय्यद सलीम जामकर, न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक ए. एस. पाटील, वरिष्ठ लिपिक एस. पी. धारूरकर, निंबाळकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुनील पाटील, अमित सर, सुधीर सैतवाल, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात विशेषतः विद्यार्थिनींसह सर्व विद्यार्थ्यांना पॉक्सो कायदा, बालकांचे हक्क आणि कायदेशीर संरक्षण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुला-मुलींनी सुरक्षित व असुरक्षित स्पर्श (गुड टच आणि बॅड टच) यातील फरक समजून घ्यावा. कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची माहिती त्वरित पालक, शिक्षक किंवा पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले.



याशिवाय मोबाईलचा गैरवापर व त्याचे दुष्परिणाम, किशोरवयीन मुला-मुलींच्या शरीरात होणारे बदल आणि हार्मोन्समधील बदल याविषयीही प्रमुख वक्त्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांना सुरक्षित व जबाबदार जीवनाची दिशा देणे हा शिबिराचा उद्देश होता. या शिबिराचे आयोजन केऱ्हाळे बुद्रुक येथील पोलीस पाटील तथा पॅरा लीगल व्हॉलेंटिअर सौ. वर्षा प्रवीण पाटील यांनी केले. त्या परिसरात सातत्याने समाजहिताचे व जनजागृतीपर उपक्रम राबवत असून, विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल घडावे, यासाठी प्रयत्नशील असतात.

मृत्यूच्या दाढेतून ८३ वर्षीय आजोबांची सुखरूप सुटका!

ब्रेन हॅमरेजवरील आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी; न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील यांच्या उपचारांना यश

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव ✍ प्रतिनिधी

वयाची ८३ वर्षे, त्यात अपघाताने डोक्याला झालेली गंभीर दुखापत आणि मेंदूत झालेला रक्तस्राव, अशा अत्यंत नाजूक परिस्थितीत मृत्यूशी झुंज देणाऱ्या दशरथ यांना डॉ. उल्हास पाटील रुग्णालयातील न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील यांच्या कुशल उपचारांमुळे नवजीवन मिळाले आहे. ब्रेन हॅमरेजवरील आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर दशरथ पुन्हा स्वतःच्या पायावर चालू लागल्याने कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

दशरथ हे स्वच्छतागृहात गेले असताना अचानक तोल जाऊन पडले. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला जोरदार मार लागल्याने ते बेशुद्धावस्थेत गेले. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात दाखल केले. रुग्णाची गंभीर अवस्था लक्षात घेऊन न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील आणि डॉ. विपूल राठोड यांनी तपासणी सुरू केली. सीटी स्कॅनमध्ये मेंदूत रक्तस्राव झाल्याचे निदान झाले. तसेच शरीराच्या एका बाजूच्या हात-पायांची ताकद कमी झाल्याचेही आढळले. त्यामुळे रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण झाला होता.

वयाच्या ८३ व्या वर्षी शस्त्रक्रिया करणे हे वैद्यकीय पथकासमोर मोठे आव्हान होते. भूल, शस्त्रक्रियेदरम्यानची काळजी आणि त्यानंतरची देखभाल या सर्व बाबी लक्षात घेऊन डॉक्टरांनी आवश्यक तयारी केली. रुग्णाची गंभीर स्थिती पाहता तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला.



न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील, डॉ. विपूल राठोड आणि डॉ. अदिती जोशी यांच्या वैद्यकीय पथकाने आवश्यक खबरदारी घेत ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा झाली. योग्य उपचार आणि वैद्यकीय देखभालीमुळे काही दिवसांतच दशरथ पुन्हा स्वतःच्या पायावर चालू लागले. गंभीर ब्रेन हॅमरेजवर मात करून त्यांनी मिळिवलेल्या या यशामुळे कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला.

वृद्ध व्यक्ती पडल्यास डोक्याला झालेली दुखापत गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. बाहेरून जखम दिसत नसली तरी मेंदूत रक्तस्राव झालेला असू शकतो. चक्कर येणे, बेशुद्ध पडणे, उलट्या होणे, बोलण्यात अडचण येणे किंवा हात-पायांची ताकद कमी होणे ही धोक्याची लक्षणे आहेत. अशा वेळी वेळ न घालवता रुग्णालयात दाखल करून सीटी स्कॅनसारख्या आवश्यक तपासण्या कराव्यात. योग्य वेळी निदान आणि उपचार मिळाल्यास गंभीर परिस्थितीतही रुग्ण बरा होण्याची संधी असते, असे न्यूरोसर्जन डॉ. अनिकेत पाटील यांनी सांगितले.

लाईफस्टाईलकडे लक्ष द्या

आज पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण फार मोठ्या वेगाने केले जात आहे. अशा या युगात मुलीच्या लाईफ स्टाईलकडे लक्ष देण्याची गरज आहे, त्यामुळेच तिचा विकास व भविष्य योग्य मागार्ने पुढे जाईल. म्हणूनच आज आईची भमिकाही महत्वपूर्ण आहे.



आधुनिक तेच्या नावाखाली असभ्य पोशाखांचे प्रमाण वाढत आहे. अर्धनग्न कपडे, असभ्य व्यवहार, गर्विष्ठ वाणी भोजनात झालेला फास्ट फूडचा समावेश हीच आता किशोरवीय मुलींची लाईफ स्टाइल बनली आहे.

मुलींना हे समजावून सांगावे की पातळ अथवा पारदर्शक कपडे घातल्याने अंर्तवस्त्राचेही दर्शन होते. त्यामुळे रस्त्यातून जाताना तिला नको त्या प्रसंगांना, टोमण्यांना सामोरे लागेल अथवा एखाद्या अडचणीतही पडू शकते.

तिला लहानपणापासूनच संस्कारांचे अथवा नग्न व्यवहाराचे शिक्षण द्यावे. घरातही शरीर दाखवणारे कपडे घालणे शोभते नाही. हे तरुण होणाःया मुलीला समजून सांगावे.

कारण घरात वडील, भाऊ व इतर पुरुष नातेवाईकही असतात. पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन नात्यांच्या मयार्दाही धुळीला मिळू नयेत. याची काळजीदेखील आईने घेतली पाहिजे. मुलीला सौंदर्य प्रसांधनाएिवजी कधी-कधी नैसर्गिकरित्या सौंदयार्ची देखभाल करण्यासही प्रवृत्त करावे. त्याचे फायदे, देखभाल सांगावेत.

फास्टफूडमुळे होणाऱ्या हानिबाबत सांगावे व पौष्टिक आणि संतुलित भोजनाची सवय हळूहळू लावून द्यावी. जेणेकरून तिचा विकास योग्य पद्धतीने होईल. किशोरींना तुम्ही एक मैत्रीण बनून मार्गदर्शन केलेत तर कदाचित ही समस्याही सुटू शकेल.

वास्तूनुसार घरामध्ये फक्त १ रोप ठेवा आणि मग बघा चमत्कार

बरेच लोक त्यांच्या घरात इनडोअर रोपे लावतात. जसे मनी प्लांट, बांबू प्लांट, क्रॅसुला ओवाटा इ. तथापि, अशी एक वनस्पती आहे जी घरी लावली तर खरोखरच चमत्कारिक फायदे होतील. चला जाणून घेऊया या वनस्पतीची खासियत काय आहे आणि ही वनस्पती लावल्याने कोणते फायदे होतात?

स्नेक प्लांट म्हणजे काय :


स्नेक प्लांटचे नाव तुम्ही क्वचितच ऐकले असेल. आजकाल या रोपाची बरीच चर्चा होत असून आता घराघरातच नव्हे तर चौकाचौकातही त्याची लागवड केली जात आहे. स्नेक प्लांट एक सामान्य घरगुती वनस्पती आहे ज्याला सॅनसेव्हेरिया ट्रायफॅसियाटा देखील म्हणतात. त्याला 'एअर प्युरिफायर' असेही म्हणतात. ही तलवार किंवा सापाच्या आकाराची वनस्पती आहे. हे बर्याचदा घर सजावट म्हणून वापरले जाते. ते पिकवण्यासाठी फारसे पाणी लागते असे वाटत नाही. त्याची पाने विषारी आहेत, म्हणून ती मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवा किंवा सावधगिरी बाळगा.

स्नेक प्लांट लावण्याचे फायदेः

- यामुळे घरातील हवा शुद्ध होते आणि ऑक्सिजनची पातळी वाढते.
- यामुळे घरात सुख-शांती नांदते ज्यामुळे धन-समृद्धीचा मार्ग खुला होतो.
- नागाचे रोप लावल्याने व्यक्तीच्या घरातील अनेक समस्यांपासून सुटका मिळते.
- स्नेक प्लांटमुळे हवेतील प्रदूषकांना होणारा कर्करोग कमी होतो.
- झाडाची पाने जखमा, भाजणे आणि सूज यावर वापरली जाऊ शकतात.
- मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि नैराश्य कमी करण्यासाठी ही वनस्पती फायदेशीर मानली जाते.
- ऍलर्जी आणि दम्याच्या रुग्णांसाठी स्नेक प्लांट फायदेशीर आहे.
- डोकेदुखीचा त्रासही स्नेक प्लांटने बरा होऊ शकतो.
- घरामध्ये स्नेक प्लांट लावल्याने रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते.

फोनच्या चार्जरचा रंग काळा किंवा पांढराच का? जाणून घ्या

तुम्ही आजपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे फोन वापरले असतील. तुम्हाला त्यासोबत येणाऱ्या चार्जच्या रंगांविषयी माहिती आहे का?, या चार्जरचे रंग तुम्हाला दोनच दिसतील. एक म्हणजे पांढरा रंग आणि दुसरा म्हणजे काळ्या रंगाचे चार्जर, हे दोनच चार्जरचे रंग का असतात?, असाही प्रश्न अनेकांना पडतो. तुम्हाला असा प्रश्न पडला असेल, तर याचीच सखोल महिती आम्ही तुम्हाला देणार आहोत.



स्मार्टफोन बाजारात अनेक प्रकारच्या रंगांचे डिव्हाईस येतात. त्यात काळा, पांढरा, गुलाबी, लाल असे अनेक रंग आपल्याला दिसतात. पण, फोनच्या चार्जरचा रंग हा फक्त काळा आणि पांढराच का असतो, असा प्रश्न तुम्हाला अनेकदा पडला असेल. याविषयीचे कारण आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. तसेच तुम्हाला या चार्जरच्या रंगांविषयीच्या काही माहिती नसलेल्या गोष्टी देखील कळू शकतील. चला तर जाणून घेऊया.

तुमच्या माहितीसाठी एक गोष्टी आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की फोनचा चार्जर हा फक्त आणि फक्त काळ्या आणि पांढऱ्या रंगातच येतो. काळा आणि पांढरा रंग हा अत्यंत किफायत किंमतीत येतो, यासह काळ्या आणि पांढऱ्या रंगांचे चार्जर तयार करण्याचा खर्च देखील खूप कमी लागतो.

बरं वरील एक कारण झालं. दुसरं कारण देखील तितकंच महत्त्वाचं आहे. मोबाईल फोनचे चार्जर हे काळे किंवा पांढरे यासाठी असतात कारण काळा रंग हा अधिक ड्यूएबलिटीसह येतो. हा रंग बाकी चार्जरच्या तुलनेत अधिक उठून देखील दिसतो. किंवा स्पष्ट दिसतो असं आपण म्हणू शकतो.

तुम्हा मोबाईलच्या चार्जरच्या रंगांविषयी आम्ही आणखी एक अशी गोष्ट सांगणार आहोत. ज्यामुळे तुम्हाला देखील हे पहिल्यांदाच माहिती होईल. मोबाईल कंपन्या विशेष म्हणजे दिग्गज मोबाईल कंपन्या या विषेश म्हणजे पांढऱ्या रंगांचेच चार्जर बनवतात. कारण, बाहेरून येणाऱ्या उष्णतेला हा रंग चार्जिंगच्या प्रक्रियेवर कोणताही परिणाम करू देत नाहीं. कारण, तुम्हाला माहिती आहे की उन्हात आपण नेहमी डोक्यावर पांढऱ्या रंगाचा रुमाल किंवा टोपी घालतो. कारण, पांढऱ्या रंगाने सूर्याची उष्णता आपल्याला अधिक लागत नाही. असंच यामध्ये देखील आहे. म्हणून चार्जर पांढऱ्या रांगांचे असतात. यामुळेच बॅटरी चार्ज करणारे डिव्हाइस हे जास्त करून पांढऱ्या आणि काळ्या रंगांचेच असतात. कारण त्यांची बॅटरी देखील त्याच रंगांची असते.

'हे' देखील जाणून घ्या

फोन चार्जरमध्ये दोन मुख्य घटक असतात. त्यामध्ये प्लग आणि केबल या दोन गोष्टींचा समावेश असतो. प्लग हा तो भाग आहे जो पॉवर सोर्ससी कनेक्ट होतो. तर केबल प्लगला आपल्या फोनशी जोडते.

वायर दोन प्रकारचे का?

फोन चार्जर वापरताना वायर दोन प्रकारचे असतात, हे तुम्हाला माहिती आहे का, नसेल तर माहिती करून घ्या. पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह असे दोन वायर असतात. वायर्सची ध्रुवीयता समजून घेतल्यास आपण चार्जर योग्यरित्या कनेक्ट करतो हे कळतं. यामुळे फोनचं नुकसान टळू शकतं.

स्वयंपाकघरातच दडलंय वजन कमी करण्याचं रहस्य

बदलत्या जीवन शैलीमुळे लोकांमध्ये लठ्ठपणाची समस्या वाढताना दिसत आहे. वजन कमी करण्यासाठी प्रत्येक जण सतत प्रयत्न शील असतो. वजन कमी करण्यासाठी लोकं विविध प्रकारच्या औषधांचा देखील वापर करतात. परंतु डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेल्या औषधांचा वाईट परिणाम शरीरावर होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वजन कमी करण्याचं मोठं रहस्य तर आपल्या स्वयंपाक घरात दडलेलं आहे.



मेथीच्या बिया:

एक चमचा मेथीदाणे पाण्यासोबत घेतल्यास अपचनाची समस्या दूर होते. मेथीचे दाणे आर्थरायटीस आणि साईटिका समस्यांवर रामबाण उपाय आहेत. सुमारे एक ग्राम मेथीदाण्यांची पावडर आणि सुंठ पावडर यांचे मिश्रण गरम पाण्यातून दिवसभर दोन-तीन वेळा घेतल्याने लाभ होतो.

जिरे:

शरीरातील अनावश्यक चरबी बाहेर काढण्यास जिरे मदत करते. तसेच जिरेपूड खल्ल्यानंतर एक तास काहीही खाऊ नका. भाजलेले हिंग, जिरे, काळे मिठ आणि पावडर १-३ ग्रॅम समान प्रमाणात करा. हे मिश्रण दिवसातून दोन वेळा दह्यासोबत घ्या. त्यामुळे तुमचा लठ्ठपणा कमी होईल

लसूण:

लसणामध्ये एलिसिन घटक मुबलक प्रमाणात आढळत असल्याने फॅट बर्न करण्यास मदत होते. यामुळे वजन आटोक्यात ठेवण्यासही मदत होते. लसणामध्ये फायबर्स घटक बद्धकोष्ठता, पचनाचे विकार कमी करण्यास मदत करतात.

मध आणि लिंबू:

सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात एक चमचा मध आणि अर्धा लिंबू पिळून ते पाणी प्यावे. यामुळे सारख्या लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण राहाते.

सुंदर दिसण्यासाठी लसून एकमेव उपाय



आता सर्वच महिला त्याचप्रमाणे पुरूष देखील सतत आकर्षक आणि उठाव दिसण्यासाठी कायम प्रयत्न करत असतात. त्यासाठी अनेक सौंदर्य प्रसाधने देखील बाजारात उपलब्ध आहेत. परंतू हे रसायन मिश्रीत प्रसाधने काहींच्या त्वचेला घातक ठरतात. त्यामुळे अशा व्यक्तिंच्या त्वचेसाठी लसून एकमेव उपाय आहे.

स्ट्रेच मार्क्स दूर होतात :

अनेकांच्या शरीरावर स्ट्रेच मार्क्स असतात. हे स्ट्रेच मार्क्स लठ्ठपणामुळे, आनुवंशिकता किंवा इतर कारणांमुळे शरीरावर येत असून ते लवकर जात नाही. लसणाचा रस काढून हा रस ऑलिव्ह ऑईलमध्ये मिसळा. हे मिश्रण गरम करा आणि थंड झाल्यानंतर ते स्ट्रेच मार्क्सवर लावून मसाज करा. दररोज हा उपाय केल्याने तुम्हाला नक्कीच फरक जाणवू शकतो.

चेहऱ्यावरील मुरुम दूर होतात :

लसूण घासून त्याचा रस काढून घ्या आणि हा रस चेहऱ्यावरील मुरुमांवर लावा. ५ मिनिटांनंतर चेहरा धुवून घ्या. या उपायाने तुमच्या चेहऱ्यावर तुम्हाला नक्कीच फरक जाणवेल.

नेमके काय आहे 'कीटो डायट'?

वजन घटविण्यासाठी लोक डायटिंग, म्हणजेच आहार पद्धतीमध्ये बदल करण्याचा पर्याय निवडतात. हे योग्यही आहे, कारण वजन घटविण्यासाठी सत्तर टक्के आहारनियम आणि उर्वरित तीस टक्के व्यायाम असे समीकरण आहारतज्ञांनी सांगितलेले आहे. त्यामुळे केवळ भरपूर व्यायाम करूनही जर आहारावर नियंत्रण नसेल, तर वजन घटविण्याच्या प्रयत्नांना यश येत नाही. हे वास्तव आता सर्वमान्य असल्यामुळे वजन घटविण्यासाठी आता आहारावर जास्त लक्ष दिले जाऊ लागले आहे. त्यासाठी निरनिरळ्या आहारपद्धती किंवा डायट अवलंबली जात असतात. या अनेकविध आहारपद्धतींपैकी सध्याच्या काळामध्ये कीटो, किंवा कीटोजेनिक डायट विशेष लोकप्रिय ठरत आहे. त्याविषयी जाणून घेऊ या.

कीटोजेनिक आहारपद्धतीमध्ये कर्बोदकांचे सेवन अतिशय कमी असून, यामध्ये स्निग्ध पदार्थांचे, म्हणजे फॅटस् चे सेवन अधिक आहे. येथे स्निग्ध पदार्थांचा अर्थ 'तळलेले किंवा तेलकट, तुपकट पदार्थ' असा नसून, ज्यामध्ये नैसर्गिक फॅटस् आहेत असे पदार्थ, असा आहे. तसेच शरीराला आवश्यक तेवढी प्रथिने देखील या आहारपद्धतीच्या अंतर्गत सेवन करायची आहेत. या डायटमुळे शरीरामध्ये साठलेली अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होते. या आहारामध्ये स्निग्ध पदार्थांचे सेवन अधिक असून, या स्निध पदार्थांचे चयापचय होत असताना 'कीटोन्स' नामक कंपाउंड तयार होत असतात. शरीराला सक्रीय राहण्याकरिता जी उर्जा आवश्यक आहे ती या कीटोन्स कडून मिळत असते. थोडक्यात सांगायचे झाले, तर शरीराला सक्रीय ठेवण्यासाठी जी उर्जा आवश्यक असते, ती शरीरातील कीटोन्स मधून घेतली जात असल्याने या आहारपद्धतीच्या अवलंबामुळे कॅलरीज वेगाने खर्च होतात.

या आहारपध्दतीमध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय कमी असल्याने ब्लड शुगर लेव्हल्स मध्ये वाढ होत नाही, आणि त्या नियंत्रित राहतात. त्यामुळे मधुमेह असणाऱ्या व्यक्तींसाठी ही आहार पद्धत लाभकारी आहे. या आहारपद्धतीमुळे ट्रायग्लिसराईड्स आणि एलडीएल कोलेस्टेरोलची पातळी कमी होत असून, एचडीएल (good cholesterol) ची पातळी वाढते. त्यामुळे हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी देखील हे डायट चांगला पर्याय आहे. तसेच या आहारामध्ये स्निग्ध पदार्थांचा समावेश जास्त असल्याने भूक लवकर शमून, वारंवार भूक लागणे, किंवा एखादा पदार्थ, विशेषतः गोड पदार्थ सतत खावासा वाटणे (cravings) अश्या प्रकारच्या भावना कमी होऊ लागतात.

या आहार पद्धतीमध्ये सागरी खाद्य (sea foods), म्हणजेच मासे समाविष्ट केले जातात. यांमध्ये कर्बोदकांचे प्रमाण कमी असून, प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. तसेच शरीराला आवश्यक अश्या ओमेगा थ्री फॅटी ॲसिड्सचे प्रमाणही यामध्ये मुबलक आहे. त्यामुळे आठवड्यातून किमान दोनवेळा मासे कीटो डायटमध्ये समाविष्ट केले जावेत. मांसाहारी व्यक्तींना माश्यांच्या जोडीने चिकन व अंडी आहारामध्ये समाविष्ट करता येतील. क जीवनसत्व आणि क्षार असलेल्या भाज्या व फळे या आहार पद्धतीमध्ये समाविष्ट करायची आहेत. यामध्ये ताजा पालक, ब्रोकोली, फ्लॉवर, ॲव्होकाडो, दही, पनीर, सुका मेवा, वेगवेगळ्या बिया (सूर्यफूल, भोपळा, अळशी, चिया सीड्स) इत्यादींचा समावेश आहे. या व्यतिरिक्त घरचे ताजे लोणी, साखर आणि दुध विरहित चहा/ कॉफी, चीझ या पदार्थांचा समावेश आहारामध्ये करावा.



डाळ-मेथ्यांची उसळ/ भाजी

साहित्यः- दीड वाटी तुरीची डाळ, एक टेबलस्पून किंवा आवडत असेल तर जरा जास्तही मेथ्या, एक मध्यम मोठा कांदा, २/३ हिरव्या मिरच्या, मूठभर हिरवीगार ताजी फडफडीत कोथिंबीर, ४-५ चमचे तेल, मोहोरी -जिरं अर्धा चमचा, मोठी चिमटी हिंग, ५-६ लसूण पाकळ्या, लाल तिखट (आवडीनुसार), मीठ चवीनुसार, घरचा असेल तर उत्तमच नाहीतर बाजारचा (मी अंबारीचा वापरला) अर्धा चमचा गोडा मसाला.



पाककृतीः- तुरीची डाळ आणि मेथ्या निसून, स्वच्छ करून एकत्रच पाण्यात भिजत घालावं तासभर तरी. नंतर निथळून फोडणीत घालायला तयार ठेवावं. फोडणीत पडण्याआधी डाळ. मेथ्यांमधलं पाणी पूर्णपणे निघून जायला हवं. एकीकडे भांडभर पाणी गरम करत ठेवावं.

दोन लहान चमचे तेलाची खमंग फोडणी करून त्यात मोहोरी-जिरं-मोठी चिमटी हिंग घालून वर जरा जाड चिरलेला कांदा आणि हिरव्या मिरच्या घालाव्यात. फार परतत बसायचं नाही कांदा जरा पारदर्षक झाला की डाळ + मेथ्या घालाव्या आणि अगदी बारीक आचेवर चांगले ८-१० मिनिटं तरी परतावं. अतीच कोरडं वाटलं तर पाणी न घालता लहान चमचाभर तेल घालावं. डाळ चांगल्यापैकी परतल्या गेली की शिजल्यानंतर जरा मोकळी होते म्हणून परतणं आवश्यक आहे. वात आता हळद , मीठ आणि बेताचं गरम पाणी घालून एकदा ढवळावं आणि वर झाकण घालून उसळ नीटपैकी शिजू द्यावी. अधून मधून जरा पाहायला लागेलच अर्थात; पाणी कमी वाटलं तर बेताबेतानंच घालायचं आहे. ही अगदी गीर्र शिजवायची नाहीय, सो ९०-९५% झाली की आच बंद करावी, गरम मसाला आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घालून नीट हलवून झाकण घालून १० मिनिटं तरी मुरू द्यावं.

आता सगळ्यात मस्त प्रकार - वाढायच्या अगदी आधी उरलेलं तेल लहान कढल्यात कडकडीत तापवून त्यात लसूण ठेचून लालसर तळून घ्यावा; आच बंद करून रंगापुरतं लाल तिखट घालून हे उसळीवर ओतावं. मधून मधून कोथिंबीरीचा हिरवा, डाळीचा पिवळा, कमी प्रमाणात मेथ्यांचा तपकिरी आणि वरून ओतलेल्या फोडणीचा लाल + खरपूस सोनसळी लसणाचा असे विविध रंग असलेली डाळ-मेथ्यांची उसळ तयार आहे. अत्यंत टेस्टी अशी ही उसळ पोळी, भाकरी बरोबर गरमच खावी. भाकरीबरोबर विशेष चविष्ट लागते.

अधिक टिपाः

तुरीच्या डाळीचा प्रकार जरी असला तरी टेक्स्चर उसळ टाईप + अगदी अंगासरसा रस असं असायला हवंय. सो त्यामानानी गरम पाणी बेतानी घालत शिजवायचं आहे.

टेबलस्पूनभर जरी मेथ्या असल्या तरी कडसर चव नव्हती; असली तरी मला जाणवली नाही.

स्ट्रेट हेअरसाठी उत्तम उपाय

सध्या स्ट्रेट हेअरचा ट्रेंड आहे. हेअर स्ट्रेट करण्यासाठी अनेक उपकरने बाजारात उपलब्ध आहेत. परंतू त्या उपकरनांमुळे केसांचे नुकसान देखील होते. त्याचप्रमाणे यासाठी लोकं महागडे ट्रीटमेंट करतात. पण घरातही तुम्ही आता स्ट्रेट करू शकता. हे उपाय केल्यास तुम्हाला कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही.



व्हिनेगरः

केसांना शैम्पू केल्यावर कंडिशनर करा. कंडीशनरनंतर गार पाण्यात व्हिनेगरचे काही थेंब टाकावे त्यानंतर केस धुवावे.

केळी आणि मध :

दोन केळी बारीक करून त्यात २ चमचे मध, २ चमचे ऑलिव्ह तेल आणि २ चमचे दही मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट आपल्या पूर्ण केसांवर लावून शॉवर कॅपने केस कव्हर करा. अर्ध्या तासाने केस धुऊन टाका.

एरंडेल तेल :

गरम एरंडेल तेल ने मालीश करा. नंतर गरम टॉवेलने केसांना वाफ द्या आणि ३० मिनिटांनंतर केस स्वच्छ पाण्यात धूवा.

मेंदी रंगतच नाहीये का? हे उपाय करून बघाच

मेंदी काढल्यावर बराच वेळ हातावर ठेवावी-

अनेक वेळा महिला मेंदी वाळल्यानंतर लगेचच हात धुवून टाकतात. मात्र कधीही मेंदी काढल्यानंतर ती जवळपास ७ ते ८ तास हातावर तशीच ठेवावी. भलेही ती वाळली तरीदेखील ती हातावर तशीच ठेवण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे शक्यतो मेंदी रात्रीच्या वेळात लावावी म्हणजे संपूर्ण रात्रभर मेंदी हातावर तशीच राहते आणि तिचा रंग अधिक खुलतो.

कोणत्याही शुभ कार्यामध्ये महिला वर्गामध्ये उत्साहाचं वातावरण असतं. मग अगदी कपड्यांपासून ते साजशृंगाराच्या प्रत्येक गोष्टीकडे त्या जातीने लक्ष देतात. एखादा कार्यक्रम असेल किंवा लग्न समारंभ या कार्यामध्ये मेंदी ही ओघाओघाने आलीच. लग्नकार्यामध्ये तर मेंदीशिवाय नववधुचा साजशृंगार हा अपूर्णच असतो. त्यामुळे आता मेंदीला एक विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. मात्र मेंदी काढल्यानंतर जर ती रंगली नाही. तर सहाजिकचं प्रत्येक महिलेचा उत्साह कमी होतो. त्यामुळेच मेंदी अधिक रंगण्यासाठी काही घरगुती टीप्स आहेत. या टीप्स अमलात आणल्या तर नक्कीच मेंदीचा रंग खुलून येईल.

साखर आणि लिंबूचा वापर-

साखर आणि लिंबाचा रस हे मेंदी काढल्यानंतर अत्यंत फायदेशीर ठरतं. लिंबाचा रस आणि साखर एकत्र करुन हे मिश्रण मेंदीवर लावल्यानंतर मेंदी बराच वेळ हातावर चिटकून राहते. त्यामुळे मेंदीचा रंग मस्त येतो.

लवंगांचा धूर हाताला देणे -

मेंदी काढून टाकल्यानंतर हात स्वच्छ कोरडे करुन त्याला लवंगांचा धूर द्यावा. यासाठी एका तव्यावर ५-६ लवंगा टाकून त्याच्यातून जो धूर येतो, त्या धुरावर मेंदी काढलेल्या भागावर शेक द्यावा. लवंगाच्या धूर उष्ण असल्यामुळे मेंदी चांगली रंगते.

पाण्याने धुवू नये -

अनेक वेळा लिंबू-साखरेचं पाणी लावल्यानंतर मेंदी हातावर चिटकून राहते. त्यामुळे काही महिला पाणी किंवा साबणाच्या मदतीने हात धुतात. मात्र असं केल्यामुळे मेंदीचा रंग फिकट होण्याची शक्यता असते. मेंदी सुकल्यानंतर शक्यतो काही काळ त्या भागावर पाणी लावू नये.

कपड्यावरील तेलाचे डाग घालविण्यासाठी...

- कपड्यावरील तेलाचे डाग घालविण्यासाठी त्या डागांवर थोडं पेट्रोल चोळा आणि नंतर ते कपडे धुवा.
- घरातील कोणताही पंखा (एक्झॉट फॅनसुद्धा) स्वच्छ ठेवायचा असेल तर रॉकेलमध्ये कापडाची चिंधी बुडवून त्याने फॅन घासून पुसा.
- स्वयंपाकघरात एखाद्या वस्तूनं पेट घेतल्यास त्यावर मीठ आणि खाण्याचा सोडा टाकावा. यामुळे आग पटकन विझते.
- पोट बिघडलेले असते तेव्हा आल्याचा व लिंबूचा रस एकत्र करून थोडं मीठ कालवून घ्या. बरे वाटेल.
- बागकाम वगैरे केल्यानंतर हात स्वचा व नरम राहावेत यासाठी चमचाभर गोड्या तेलात चमचाभर साखर मिसळून हातावर रगडा व नंतर पाण्याने धुवून टाका.
- तोंडात फोड झाल्यास एक हाताचे बोट दुधावरील साईत बुडवा आणि त्या जागी लावा, आराम होईल.

औषधी तुळशीचे 'असेही' फायदे

भारतात जवळपास अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं पाहायला मिळतं. हिंदू संस्कृती मानणाऱ्या अनेक कुटुंबात तुळशीचं खास महत्त्व आहे. हिंदू संस्कृतीत पूजनीय असणाऱ्या तुळशीचे औषधीय गुणधर्मही तितकेच महत्त्वाचे आहेत. तुळस आरोग्यासाठी अतिशय गुणकारी मानली जाते. जाणून घ्या तुळशीच्या पानांचे फायदे...



तणाव कमी करते -

तुळस दिवसभराचा थकवा दूर करते. अतिशय ताण असल्यास दररोज रात्री दूधात तुळशीची काही पानं टाकून, उकळून ते दूध पिण्याने फायदा होतो. याने मज्जासंस्थेला आराम मिळून तणाव कमी होण्याची शक्यता असते.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते-

तुळशीत मोठ्या प्रमाणात ॲन्टी-बॅक्टेरियल आणि ॲन्टी-इंफ्लिमेंट्री गुण असतात. जे रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्याचे काम करतात. दररोज तुळशीची पानं खाल्ल्याने फ्लूचा धोकाही दूर होण्यास मदत होते.

महिलांना मासिक पाळी समस्या -

महिलांना मासिक पाळीदरम्यान अनेक प्रकारच्या समस्या होत असतात. या दिवसांत महिलांना अतिशय त्रासाला सामोरं जावं लागतं. अशा त्रासावेळी तुळशीच्या बिया फायदेशीर ठरतात. मासिक पाळीमधील अनियमितता दूर करण्यासाठी दररोज तुळशीच्या पानांचे सेवन करणे फायद्याचे ठरते.

सर्दी-खोकला -

तुळशीचा काढा सर्दी-खोकल्यावर रामबाण मानला जातो. काढा बनवण्यासाठी तुळशीची पानं पाण्यात टाकून त्यात काळी मिरी आणि खडीसाखर मिसळून त्याचे सेवन करा. सर्दीसाठी हा काढा अतिशय गुणकारी ठरतो.

दैनिक लोकशाही हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असुन त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून लोकशाही,ए-११०४, ब्लुमेन, स्टेशन रोड जवळ, माय बाप रेस्टॉरंट समोर, विक्रोळी पश्चिम, मुंबई ४०००८३ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले. This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher Rajesh kamalakar yawalkar, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at LOKSHAHI, A-1104, BLUMEN, NEAR STATION ROAD, OPP. MAAI BAAP RESTAURANT, VIKHROLI (W), MUMBAI, MAHARASHTRA - 400083..PRGI REG NO.MHMAR/26/A7630, EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष ०१ ले. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे. जळगाव कार्यालय - २२०, बळीराम पेठ, जळगाव, मो.९४२२७७५०११